
# मेहता मराठी ग्रंथजगत

मार्च, २०२२
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष बाविसावे
अंक तिसरा

## लेखकाच्या नावाची गोष्ट...



रणजित देसाई यांना आपल्या घराण्याचा, पूर्वजांचा अभिमान होता. त्यांच्या बोलण्या-चालण्यात तो दिसून यायचा. सुरुवातीला त्यांनी आपलं लेखन 'रणजित रामचंद्र देसाई' या पूर्ण नावानंच केलं होतं, पण एकदा कधीतरी त्यांचे वडील त्यांना म्हणे चिडून म्हणाले, "काय पराक्रम करायचे असतील ते स्वत:च्या नावानं करा, आमचा उद्धार नको." आणि तेव्हापासून ते फक्त 'रणजित देसाई' या नावानं लिहू लागले!

# रणजित देसाई

## यांची साहित्यसंपदा

कादंबरी




Book Available

इतिहास आणि साहित्याचे
ऊर्जस्वल नि रोमहर्षक रसायन...
साहित्य अकादमीवर मोहर...
रुपेरी पडद्याला
मोहिनी घालणारी कलाकृती...

# ॥ स्वामी ॥

कोट्यवधी प्रतींची विक्री...

मराठी वाचकांवर अधिराज्य कायम...

Book Available

निश्चयाचा महामेरू ।
बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू ।
श्रीमंत योगी ।।

छत्रपती शिवाजी महाराज
यांच्या जीवनावर आधारित
अजरामर कलाकृती

# श्रीमान योगी

ऐतिहासिक कादंबरी



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मार्च २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक तिसरा

**संपादक**

अखिल मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**संपादन साहाय्य**

पूजा भडांगे

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


**अनुक्रमणिका**


**संपादकीय** ४

**एक एक पान घडताना...** ११

'स्वामी'पल्याडचे रणजित देसाई... ३८

रणजित देसाई यांचे संगीतविषयक लेखन ४३

थोरामोठ्यांच्या नजरेतून... ४५

अक्षरलेणे... ४७

स्वामी - एक आकलन ५०

'श्रीमान योगी' डोक्यावर ठेवून... ५२

**श्रद्धांजली** ५५

**दिनविशेष** ६१



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

**संपादकीय**

# मराठी साहित्यातील अभिजात लेणं – रणजित देसाई

पद्मश्री रणजित देसाई म्हणजे मराठी साहित्यविश्वातले पहिले 'सेलिब्रिटी लेखक' ज्यांना 'न भूतो न भविष्यति' असं रसिक वाचकांचं अफाट प्रेम आयुष्यभर मिळत राहिलं. यशाच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान असतानाही आपलं अत्यंत साधं, मायाळू आणि उमदं व्यक्तिमत्त्व सांभाळणारा हा लेखक आजही प्रत्येक मराठी वाचकाच्या मनात घर करून आहे. आपल्या साहित्यकृतींच्या माध्यमातून कोवाडचं नाव जगाच्या नकाशावर अधोरेखित करणारे रणजित देसाई काहींसाठी 'स्वामी'कार बनले तर काहींसाठी 'साहित्य अकादमी', 'पद्मश्री' असे सन्माननीय पुरस्कारप्राप्त लेखक; पण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या परिवारासाठी शेवटपर्यंत ते आमचे लाडके दादाच राहतील.

यावर्षी दादांचा तिसावा स्मृतिदिन. त्यांची पुस्तकं प्रकाशित करणं आणि वाचकांपर्यंत अखंडितपणे पोचवत राहणं ही आमच्यासाठी कायमच आनंदाची गोष्ट राहिलीय. आज दादांच्या असंख्य आठवणी चाळताना, त्यांना हा विशेषांक समर्पित करताना त्यांच्यासोबत जुळून आलेला ऋणानुबंध आमच्यासाठी किती भाग्याचा होता याची वारंवार प्रचिती येतेय.

कोवाडच्या इनामदार घराण्याचा वारसा, घरात संगीताचं वातावरण आणि परंपरेनं आलेला शेतीचा व्यवसाय असं सगळं कौटुंबिक वातावरण असतानाही दादांनी एका हातात नांगर आणि एका हातात लेखणी धरली. आजीचे संस्कार, मराठी-इंग्रजीचं विपुल वाचन याचा त्यांच्या

जडणघडणीवर संस्कार होत गेला. संवेदनशीलता, निरीक्षणशक्ती, चिंतन-मनन करण्याची वृत्ती या साऱ्याला उत्कटतेची आणि उदात्ततेची जोड मिळत गेल्यामुळं दादांचं 'स्वतंत्र' व्यक्तिमत्त्व घडत गेलं. 'स्वामी'कार आकाराला येत गेला.

आपल्या लेखनाच्या प्रारंभीच्या काळात कथा-कादंबऱ्यांतून ग्रामजीवनाचं चित्रण करणाऱ्या दादांनी 'स्वामी' ही कादंबरी लिहिली आणि मराठी कादंबरीच्या क्षेत्रात इतिहास घडला. 'स्वामी' ही मराठीतील बहुचर्चित आणि वाचकप्रिय ऐतिहासिक कादंबरी ठरली. मराठीतील समीक्षक आणि वाङ्मयेतिहासकारांनी दादांच्या लिखाणाची दखल घेतली. पुराणकथेवर आधारित, प्रत्येकाच्या मनात स्थिरावलेल्या कर्णाच्या जीवनाचा शोध घेणारी 'राधेय' ही त्यांची एकमेव पौराणिक कादंबरी आहे. कलावंतांविषयी त्यांना वाटणारी आस्था, कुतूहल आणि जिव्हाळा 'राजा रवि वर्मा' आणि 'अभोगी' या दोन कादंबऱ्यांत वाचायला मिळतो. तर 'शेकरा' या शेवटच्या कादंबरीत त्यांना प्राणिमात्रांविषयी असलेला जिव्हाळा त्यांनी केलेल्या वन्यजीवनाच्या चित्रणातून दिसून येतो. अस्सल ग्रामीण वातावरणाची पार्श्वभूमी, नाट्यपूर्ण प्रसंगांची निर्मिती, खटकेबाज संवादांची योजना या ठळक वैशिष्ट्यांमुळं मराठी चित्रपटांतील तमाशाप्रधान चित्रपटांच्या मालिकेत 'रंगल्या रात्री अशा' आणि 'सवाल माझा ऐका' या दोन चित्रपटांना बरेच वरचे स्थान प्राप्त झाले आहे.

दादा हे प्रामुख्याने मराठीतील वाचकप्रिय कादंबरीकार आणि कष्टाळू ललित लेखक होते; समीक्षक नव्हते; पण साहित्य संमेलने आणि साहित्यविषयक अन्य कार्यक्रमांतून त्यांनी आपली साहित्यविषयक भूमिका आणि मतं प्रकट केली. साहित्याचं स्वरूप, त्याचं प्रयोजन, त्याचा परिणाम आणि साहित्यविषयक आदर्शवादी मतं मांडणारे दादा परंपराभिमानी होते. लेखकाची सर्जनशीलता ही प्रतिभा-सामर्थ्यावर अवलंबून असते; केवळ सन्मान, कीर्ती, अर्थप्राप्ती हीच उद्दिष्टे लेखकाने डोळ्यांसमोर ठेवू नयेत. लेखकामध्ये प्रतिभा-सामर्थ्याबरोबर जीवनाची व्यापक जाण आणि प्रामाणिकपणा असायला हवा. 'साहित्य चळवळींचा हेतू चांगला असला, तरी साहित्याचा विकास लेखकाच्या कुवतीमुळे होतो' या प्रकारची मतं बेधडकपणे मांडणाऱ्या दादांनी रंजनपरता आणि संस्कारशीलता या उद्दिष्टांना आपल्या लेखनात अधिक महत्त्व दिलं.

मनाची विशालता, मानवी प्रतिष्ठा, दया-त्याग-क्षमाशीलता, औदार्य-माणुसकी या गुणांचा पुरस्कार आपल्या लेखनातून करणारे दादा एक रसिक वाचक आणि निष्ठावान साहित्यिक म्हणून नावारूपास आले. अनेक मानसन्मान, पुरस्कार, विविध भाषांतून कादंबऱ्यांचा अनुवाद या साऱ्यातून त्यांची वाचकप्रियता आणि समाजमान्यता आजही सूचित होते. आपल्या लिखाणातून उच्च भावनिक स्तरावर कलात्मक संवाद साधणारे दादा वयाच्या ६४व्या वर्षी आपल्यातून निघून गेले. आणि त्यांचं 'एक हिरवंगार हृदय जंगल जळून खाक झालं' असं ज्येष्ठ साहित्यिक आनंद यादव यांनी 'शेकरा' या दादांच्या शेवटच्या कादंबरीच्या संदर्भात बोलताना एके ठिकाणी म्हटलंय.

एक उमद्या, दिलदार मनाचा हा थोर साहित्यिक आजही मनामनांत जिवंत आहे. त्यांच्या स्मृतींना उजाळा देताना आपल्यातर्फे प्रकाशित केलेली त्यांची सर्व पुस्तके जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचवण्याचा आणि सोबतच नवनव्या विषयांची अनेक पुस्तके आपल्यासारख्या सुजाण वाचकांपर्यंत पोचवण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असेल.

समस्त मराठी वाचक रसिकांचा आणि मेहता पब्लिशिंग हाऊस परिवाराचा महत्त्वाचा हिस्सा असलेल्या रणजितदादांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन! आपल्या संस्थेचे सर्वेसर्वा श्री. सुनील मेहता यांच्या आकस्मिक जाण्याने निर्माण झालेली पोकळी अजूनही कायम असताना लेखक-वाचक आणि अनुवादकांच्या विश्वासाचा आधार संस्थेला बळ देत आहे. सोबतच संस्थेचे संपादक अनिल मेहता यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली संस्थेची सर्व कामंही पूर्वपदावर येत आहेत.

३ मार्च, २०२२ला मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक श्री. अनिल मेहता ८२व्या वर्षात पदार्पण करत आहेत. मराठी प्रकाशन व्यवसायात अर्ध्या शतकाहून अधिक काळ सक्रिय राहून, अनुवादाच्या माध्यमातून जागतिक साहित्य मराठी वाचकांपर्यंत अविरतपणे पोचवण्याचं काम ते आजवर करत आहेत. त्यांच्या वाढदिनी त्यांचे अभीष्टचिंतन करत असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही भविष्यात अशीच वाटचाल करत राहू, असा विश्वास आहे.

## फॉर्म ४ – वृत्तपत्राच्या मालकी हक्कासंबंधीचे निवेदन

| | | |
|---|---|---|
| १) नियतकालिकाचे नाव | : | मेहता मराठी ग्रंथजगत |
| २) प्रकाशन स्थळ | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ३) प्रकाशन काल | : | मासिक |
| ४) मुद्रकाचे नाव | : | अखिल सुनील मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ५) प्रकाशकाचे नाव | : | अखिल सुनील मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ६) संपादक | : | अखिल मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ७) मुद्रण स्थळ | : | जय गणेश ऑफसेट, २०/१डी/ १ए, सोमवार पेठ, महाराजा लॉजमागे, पुणे ४११ ०११ (महाराष्ट्र) |
| ८) वृत्तपत्राची मालकी हक्क/ स्वामित्व इ. चे नाव | : | अखिल सुनील मेहता |
| कार्यालयाचा पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |

मी, अखिल सुनील मेहता, असे घोषित करतो की, वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे.

दि. ९.३.२०२२

अखिल सुनील मेहता
प्रकाशक

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

---

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

---

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon | GET IT ON Google Play | Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

# एक एक पान घडताना...

–अनिल मेहता



*रणजित देसाई आणि श्री. अनिल मेहता यांचे ऋणानुबंध जुळून येणं ही मराठी साहित्य क्षेत्राला मोठी देणगीच मिळाली असं म्हणावं लागेल. दादांचं पहिलं पुस्तक मेहता प्रकाशनाकडे येण्यापासूनच्या अनेक हृद्य आणि रंजक आठवणी वाचूया या विशेष लेखात...*

## रणजित देसाई : उमद्या मनाचा दिलदार साहित्यिक

### *रणजित देसाई यांची पहिली भेट आणि 'समिधा'*

'स्वामी' कादंबरी १९६२ला प्रकाशित झाली. १९६४ ला माझ्या वडिलांनी ती मला विकत घेऊन वाचायला सांगितली होती. तेव्हा त्याची किंमत होती तीन रुपये. ती मी वाचली आणि मी 'स्वामी'च्या प्रेमात पडलो. रणजित देसाईंबद्दल मला प्रचंड आदर वाटू लागला. लेखक म्हणून त्यांचं नाव मोठं होत होतं. त्यांची येतील ती पुस्तकं मी वाचत होतो.

या काळात एक-दोन वेळा रणजित देसाई आमच्या दुकानात आले होते; पण तेव्हा मी त्यांच्याशी फार बोलू शकलो नव्हतो; कारण मी नवखा प्रकाशक होतो; पण काही वर्षांनंतर जेव्हा पुढं मी आनंद यादवांची व इतरही अनेक

महत्त्वाच्या लेखकांची पुस्तकं प्रकाशित केली व पुस्तक विक्रीविषयीचा माझा आत्मविश्वास वाढत गेला, तेव्हा मात्र त्यांच्याशी धाडस करून बोललो. हो, त्या वेळी मी जे काही बोललो ते मला वाटतं माझं मोठं धाडसच होतं. तो प्रसंग असा -



एकदा रणजित देसाई आपल्या मुलीसोबत माझ्या दुकानात पुस्तकांच्या खरेदीसाठी आले होते. त्या वेळी त्यांच्यासोबत त्यांचे मित्र शंकरराव कुलकर्णी होते. त्या दिवशी नेमके माझे मित्र श्री. निपुणगे - जे पुण्याचे पुष्पक प्रकाशनाचे प्रकाशक होते, तेही माझ्या दुकानात आले होते.

१९६२ पासून 'स्वामी' हे प्रचंड गाजत होतं; पण त्या पुस्तकाला प्रचंड मागणी असूनही १९७३पासून प्रकाशकाकडून त्याच्या पुढील आवृत्त्या बाहेर आल्या नव्हत्या. त्याचं कारण मला माहीत नव्हतं. रणजित देसाईंना मी प्रकाशित केलेली दुकानातील पुस्तकं दाखवली. ती पुस्तकं वाचकांपर्यंत जास्तीत जास्त जावीत म्हणून मी काय कष्ट घेतो ते सांगितलं, त्या पुस्तकांचा होणारा खप सांगितला. त्यांना मी खाली तळघरात नेऊन पुस्तकांचा स्टॉक दाखवला. त्यात चालणारी/नेहमी विकली जाणारी पुस्तकं भरपूर प्रमाणात होती; पण त्यात 'स्वामी' नव्हतं. हे मी निर्देशनास आणून दिलं आणि मग त्यांना म्हणालो की, 'पद्मश्री' पुरस्कार मिळालेले, 'साहित्य अकादमी' पुरस्कृत 'स्वामी' पुस्तकाला मागणी असूनही ते उपलब्ध नाही.'

त्यांना प्रथम मी काय म्हणतोय ते नीट समजलं नाही; कारण मी सरळ विषयालाच हात घातला होता.

त्यांच्यापुढं मी प्रस्तावच मांडला, 'मला वाटतं, मी तुमच्या पुस्तकाला न्याय देऊ शकतो.'

त्या वेळी त्यांच्या 'तुझी वाट वेगळी' या येणाऱ्या नव्या नाटकाची जाहिरात मी वाचली होती. मी त्यांना ते नवं नाटक देण्याविषयी विनंती केली. त्यावर, 'विचार करतो, उद्या येतो' एवढंच म्हणून ते बाहेर पडले.

त्यानंतर मी मनातून तो विषय बाजूला केला. मनात आले, एवढे मोठे

लेखक पुन्हा माझ्याकडं कशाला येतील? कारण, रणजित देसाईंनी माझ्यासारख्या नवख्या व कोल्हापूरच्या प्रकाशकाचा विचार करावा हे तसं सोपं नव्हतं.

पण, ध्यानीमनी नसताना दुसऱ्या दिवशी दुपारी ते आले. मला म्हणाले, 'तुला माझं नाटक देतो.'

हे ऐकताच मी अक्षरशः उडालोच. मला प्रचंड आनंद झाला. मी लगेचच पेढे मागवले. रणजित देसाईंसह दुकानातील सर्व सहकाऱ्यांना पेढे वाटले.

त्यानंतर पंधराएक दिवसांनी रणजित देसाईंचा फोन आला.

'एक नवीन कादंबरी लिहिली आहे. 'समिधा.' या आणि घेऊन जा.' असा निरोप दिला.

'साहेब, तुम्ही कुठं आहात? मी आत्ता येतो आणि कादंबरी घेतो.'

'मी बेळगावला आहे.'

'ओ.के. आता नऊ वाजलेत. मी बरोबर बारा वाजेपर्यंत पोचतो.'

मी माझी गाडी काढली. सोबत दुकानातल्या श्रीपाद नाईक नावाच्या माझ्या सहकाऱ्याला घेतलं आणि लगेचच बेळगावला निघालो. दुपारपर्यंत हिंदवाडीत त्यांच्या घरी पोहोचलो.

त्यांचं घर म्हणजे एक मोठा वाडाच. शुभ्र गाद्या, लोड. सगळं अगदी छान, टापटीप व कलात्मक. दादांनी व माधवीताईंनी आमचं स्वागत केलं. काही गप्पा झाल्या. मग रणजित देसाईंनी कादंबरीचं संपूर्ण कथानक मला सांगितलं आणि 'हे हस्तलिखित तुम्ही पंधरा दिवसांनी कोवाडला या आणि तिथून नेलंत तर बरं होईल.' असं माधवीताई म्हणाल्या.

मी म्हटलं, 'ठीक आहे. कोवाडला येतो.'

त्यानंतर बरोबर पंधरा दिवसांनी प्रा. कमलाकर दीक्षित नावाच्या समीक्षक मित्राला सोबत घेऊन एस.टी.नं लगेचच निघालो. दिवेलागणीच्या वेळी कोवाडला पोहोचलो. रणजित देसाईंचं गावात मोठं प्रस्थ. बसस्टॉपवर पोहोचताच हातात कंदील-काठ्या घेऊन दोन माणसं आम्हाला घ्यायला आली. त्यातील एक पांडुरंग कुंभार हे रणजित देसाईंचे लेखनिक होते. त्यांच्यासोबत आम्ही वाड्यावर गेलो. मी कमलाकर दीक्षित यांची रणजित देसाईंना ओळख करून दिली. आम्ही तिघंही गप्पा मारत बसलो. दादांनी हस्तलिखित दिलं. दीक्षित मद्यपान करत नसत. ते म्हणाले, 'मी दुसऱ्या खोलीत हे वाचत बसतो.' मग मी व रणजित देसाई दोघंच बराच वेळ

रात्रीच्या किर्र शांततेत गप्पा मारत बसलो. रणजित देसाईंच्या बोलण्यात खूप आपलेपणा होता. मी त्यांना 'साहेब' म्हणायचो. बोलता बोलता ते मला म्हणाले, 'तू मला इथून पुढं दादा म्हणत जा.' आणि मला वाटतं, त्या एका शब्दानं त्यानंतर आमच्या नात्याची घट्ट गुंफण विणली गेली. आमचं नातं प्रकाशक-लेखक असं व्यावसायिक राहिलं नाही.

रात्री उशिरा आम्ही जेवलो व झोपलो. सकाळी दीक्षित मला म्हणाले, ''या पुस्तकात चारएक ठिकाणी मला काहीतरी खटकतंय; पण ते लॉजिकल असं काही नसावं असंही वाटतंय; कारण इतक्या मोठ्या माणसाच्या चुका दाखवायच्या का?''

मी म्हटलं, ''काल रात्रीच्या गप्पांवरून तरी देसाई मला साधे आणि सरळ वाटले. आपण सांगूया. अर्थात, आपल्याला हे पुस्तक काढायचंच आहे; पण सांगून पाहूया. काही बदल करता येतो का विचारूया.''

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी आम्ही दादांशी बोललो, तर दादांनी ताबडतोब तिन्ही ठिकाणी दुरुस्त्या केल्या; पण चौथ्या ठिकाणची दुरुस्ती त्यांनी केली नाही. ती एक शिवी होती व ती मराठी पुस्तकात आजपर्यंत कोणी वापरलेली नव्हती.

दीक्षित म्हणाले, ''स्वामी' वाचल्यानंतर किंवा रणजित देसाईंसारख्या लेखकाच्या पुस्तकात ही शिवी वाचवत नाही. डोक्यात बसतच नाही.''

तर ते म्हणाले, 'तू त्या दृष्टीनं बघूच नको; कारण 'स्वामी'चा विषयच वेगळा आहे. ही कथा दलितावर आहे. तूच सांग, की ही शिवी जर यातून काढून टाकली तर या वाक्याला फारसा अर्थ राहील का? तो माणूस आपल्या मेलेल्या बापाची अंत्ययात्रा काढणार असतो; पण ती त्याला काढू दिली जात नाही, तर अशा वेळी तो जी शिवी हासडेल तिथं दुसरी शिवी बसेल का? कुठली बसेल तू सांग, मी बदलतो.'

त्यावर आम्हाला काही सुचेना. मग मीच म्हटलं, 'बरोबर आहे. त्या ठिकाणी तीच शिवी योग्य आहे.'

हे बोलणं झाल्यानंतर मी दादांना म्हटलं, 'मला वाटतं, आपण या पुस्तकासाठी लेखक-प्रकाशक करारपत्र करूया.'

तर दादा म्हणाले, 'यापूर्वी मी कधी करार केलेला नाही, तो कसा करायचा ते तूच सांग.'

करारपत्र मी घेऊन गेलो होतोच. प्रकाशक म्हणून मी दादांसोबत रीतसर

करार केला. साक्ष म्हणून कमलाकर दीक्षित व दादांचे लेखनिक व विश्वासू सहायक पांडुरंग कुंभार यांची सही घेतली आणि या कादंबरीसाठी आगाऊ रक्कम म्हणून मी पाच हजार रुपये लगेचच दादांना देऊ केले. आणि लगोलग पुस्तकाचं हस्तलिखित घेऊन कोल्हापूरला परतलो.

मी 'समिधा'ची जाहिरात तर मोठ्या दिमाखात केली; पण इतक्या मोठ्या लेखकाची कादंबरी प्रकाशित करणं हे माझ्यापुढं खरोखरच आव्हान होतं. कमलाकर दीक्षितांना हे मी बोलून दाखवलं. त्या वेळी त्यांनी माझी व बाबा पाटील या संपादकांची गाठ घालून दिली. बाबा पाटील हे दादांचेही मित्र होते. त्यांनी मुद्रिते तपासून देण्याचं काम आनंदानं स्वीकारलं. पुण्यातील कल्पना मुद्रणालयाचे अण्णा लाटकर यांच्याकडं छपाईचं काम दिलं. मुखपृष्ठ चांगलं असणं यासाठी मी सदैव आग्रही असतो; पण ते मनासारखं होईना. त्या वेळी दादा घटप्रभेला होते. मी तिथं गेलो, तेव्हा ते मला म्हणाले, ''महिनाभर थांब. बेळगावचे एक चांगले चित्रकार आहेत, के. व्ही. कुलकर्णी. त्यांना सांगतो.'' त्याप्रमाणं दादांनी के. व्ही. कुलकर्णी यांना सांगितलं आणि पुस्तक तयार झालं.

१९७९च्या दरम्यान 'समिधा' ही दादांची कादंबरी आम्ही प्रकाशित केल्यानंतर माझ्यात व दादांमध्ये एक विश्वासाचं व प्रेमाचं अतूट नातं तयार झालं. दादा मला त्यांचा मानसपुत्र म्हणू लागले.

### *दादांची सर्व पुस्तकं माझ्याकडे*

'समिधा'ची पहिली आवृत्ती हातोहात संपली; पण तिकडं रा. ज. देशमुखांनी दादांना पत्र लिहिलं, 'तुम्ही तुमची पुस्तकं जर इतर प्रकाशकांना देणार असाल, तर तुमची माझ्याकडं असलेली सर्वच पुस्तकं त्यांच्याकडं द्या.' दादांनी मला हे कळवलं. त्या काळात त्या सर्व पुस्तकांची किंमत अंदाजे तीन लाखापर्यंत होती. माझ्यापुढं मोठा पेच उभा राहिला. एवढी मोठी रक्कम उभी करणं मला शक्य नव्हतं; पण तरीही मी हा धाडसी निर्णय घेण्याचं ठरवलं. मी कोवाडला गेलो. दादांना म्हणालो, 'तुमची ही तीन लाखांची पुस्तकं मला दोन लाखांत द्या. तुमचं आत्ता एक लाखानं नुकसान होईल; पण त्याची काळजी करू नका; कारण तुम्हाला पुढं मिळणारी रॉयल्टी ही कैक पटीनं असेल याची मला खात्री आहे.' दादा थोडे धास्तावले. राजाभाऊ मराठे नावाच्या त्यांच्या बेळगावच्या वकील मित्राला त्यांनी चर्चेसाठी बोलावून घेतलं.

ते आले. जवळजवळ तीन तास आमची चर्चा चालली. मग दादांनी मला होकार दिला आणि त्यानंतर दादांची सर्व पुस्तकं रा.ज. देशमुखांकडून माझ्याकडं आली.

***'स्वामी'***




दादांची 'स्वामी' ही कादंबरी १९७३नंतर छापलीच गेली नव्हती. मी हेच पुस्तक सर्वप्रथम प्रकाशित करण्याचं ठरवलं; कारण बाजारात तिला मागणी होती. मी जाहिरात केली की ही कादंबरी सवलतीत दहा रुपयांत मिळेल. १९८१ला ती मी प्रकाशित केली. अपेक्षेप्रमाणं वाचकांनी या पुस्तकाला प्रचंड प्रतिसाद दिला. जाहिरातीचा उपयोग झाला. नेमकी त्याच वेळी 'स्वामी' एम.ए. (मराठी)ला शिवाजी विद्यापीठात अभ्यासक्रमात लागली. मी दहा हजार प्रती छापायचे ठरवले. त्यासाठी कागद हवा होता. त्या वेळी क्रमिक पुस्तकांसाठी सरकारतर्फे हिरवा कागद मिळायचा. त्यासाठी काही प्रकाशक व प्रिंटर्स काम पाहत. त्यापैकी एका प्रकाशकाला मी विनंतीचा अर्ज केला; पण त्यांनी उत्तर पाठवलं, की 'जास्तीत जास्त हजार प्रतींसाठी फक्त कागद देईन.' हे चुकीचं होतं. त्यांनी स्वतः एक समीक्षापर पुस्तक छापलं होतं व ते हिरव्या कागदावर होतं. हे मला माहीत होतं. मी त्यांना सरळ म्हटलं, 'ठीक आहे, तर तुमचा कारभार कसाकसा चालतो हे मी उघडकीस आणतो.' त्यावर मात्र ते नरमले व त्यांनी आम्हाला दहा हजार प्रतींसाठीचा कागद दिला.

त्या सर्व प्रती संपल्या. नंतरही 'स्वामी'च्या बऱ्याच आवृत्त्या निघाल्या. अनेक लोकांनी 'स्वामी' दहा-दहा वेळा वाचल्याचे सांगितले आहे. काही वाचकांनी तर 'स्वामी' देवघरात पुजलीय.

या कादंबरीवर थेऊरच्या गणपतीचा फोटो आहे. कादंबरी प्रकाशित झाली त्या वेळी मी थेऊरला जाऊन आलो. त्या वेळी दादा म्हणालेले, की 'आपण तिघं एकदा सोबत जाऊया.' मग एकदा दादा व माधवीताई पुण्याला आले होते तेव्हा तिघंही थेऊरला गेलो होतो. तेव्हा दादांनी मला तिथल्या गणपतीचं महत्त्व सांगितलं. 'सतीचा हात' दाखवला. समाधी वेगळी व हात वेगळा. सतीचा हात असतो हे मी प्रथमच ऐकत होतो. रमाबाई तिथं सती

गेल्या होत्या. जिथं जवळच एक नदी होती. रमाबाई व माधवराव तिथं कसे राहत होते, रमाबाई कशा सती गेल्या याचं वर्णन मी एखादा सिनेमा बघावा तसं मला त्यांच्या तोंडून ऐकताना वाटलं.

'स्वामी' कादंबरीची पंचविसावी आवृत्ती प्रकाशित झाली तेव्हा त्या आवृत्तीचा मोठा प्रकाशन समारंभ आम्ही कोल्हापुरात शाहू स्मारक येथे त्यांच्या कन्या मधू व पारू, तसेच मराठी अभिनेत्री सुलोचनाबाई, स्मिता तळवलकर व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न केला. दुर्दैवानं हा सोहळा पाहायला दादा मात्र त्या वेळी नव्हते. आज 'स्वामी'ची अडतिसावी आवृत्ती सुरू आहे.

'स्वामी'वर दूरदर्शनवर मराठी मालिकाही आली होती. मी ती मालिका पाहत होतो; पण तिसऱ्याच भागात माधवरावांचे काका राघोबादादा यांच्यासमोर एक स्त्री नृत्य करताना दाखवण्यात आली. ते पाहून मला प्रचंड राग आला. मी ताबडतोब दादांना कोवाडहून पुण्याला घेऊन आलो. निर्माते श्रीकांत मोघे यांना बोलावणं पाठवलं. आम्ही त्यांना सांगितलं, 'तुम्ही 'स्वामी' मालिकेमध्ये स्वत:च्या कल्पनेनंच असं काही ठरवणार असाल तर ती बंद करा.' त्यांना त्यांची चूक लक्षात आली. त्यांनी माफी मागितली. मग मालिका पुन्हा सुरू झाली. दादा अडवणूक करणाऱ्यातले नव्हते; पण मला काहीतरी चुकतंय हे लक्षात येत होतं.

नंतर मी दादांना विचारलं, 'पैशाविषयी काही बोलणं झालं आहे का? तुम्ही काही लिहून दिलं आहे का?'

तर ते म्हणाले, 'काही नाही. आपला माणूस आहे. करतोय तर करू दे.'

शेवटी मीच त्यांना म्हणालो, 'स्वामी'चे हक्क मेहतांकडे आहेत, ते सांगतील त्याप्रमाणे करा असं त्यांना सांगा. मी बघतो काय ते.'

त्याप्रमाणं दादांनी त्यांना कळवलं. त्यानंतर मी श्रीकांत मोघेंना म्हणालो, 'प्रत्येक भागाचे दादांना दोन हजार रुपये द्यायला लागतील.' त्यांनी पाचशे रुपये देण्याचं मान्य केलं. त्यानंतर दादांना मानधन येऊ लागलं. अर्थात तेही कधी वेळेवर आलं नाही, असं मला नंतर समजलं.


दादा असे होते. कोणालाही हक्क देऊन टाकत. कोणी म्हटलं, कथाकथन करतो. ठीक आहे, कर. नाटक करतोहेस? कर. ते पैसे घेत नसत. त्यांना व्याख्यानासाठी बोलावणे येई, तेव्हाही त्यांची अट एकच असायची, की मला कोवाडहून घेऊन जा व कोवाडला पुन्हा सोडा. बस; पण तरीही

लोक त्यांना मानधन देत. ते पाकीट ते कधीच उघडून पाहत नसत. ते पाकीट ते त्यांनाच परत देत. त्याच संस्थेला देणगी म्हणून. फक्त एकच आठवणीनं करत, की त्याची पावती मागत. दादा पावती तरी घेतात हे पाहून मला बरं वाटायचं.

### *'श्रीमान योगी'*

जानेवारी १९८४ला आम्ही दादांची छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील 'श्रीमान योगी' ही कादंबरी प्रकाशित केली. त्या वेळी पुस्तकाची किंमत तीनशे रुपये होती व प्रकाशनपूर्व सवलतीत पन्नास रुपये किमतीत वाचकांना 'श्रीमान योगी' उपलब्ध करून दिली.

'श्रीमान योगी'च्या प्रती तयार झाल्या, तेव्हा विलेपार्ले येथील प्रसिद्ध दुकान जवाहर बुक डेपोला जाऊन तिथं पुस्तकं द्यायची ठरवली. जवाहर बुक डेपोचे मालक भोगले यांनी आम्हाला विनंती केली, 'दादांच्या स्वाक्षरीचा कार्यक्रम जर तुम्ही आमच्याकडं ठेवला तर आम्ही तो सर्व आयोजित करू.' आम्हाला आनंदच झाला. दादांना तसं कळवलं. ते तयार झाले.




'श्रीमान योगी' कादंबरी अकराशे पानांची मोठी होती. दादांनी वाचकांना स्वाक्षरी



देण्यासाठी संध्याकाळी सहा ते नऊ ही वेळ दिली होती. म्हणून आम्ही पाचशे पुस्तकं घेतली. तेवढ्या वेळेत ती पुरतील असं वाटलं. पुण्याहून आम्ही पुस्तकं घेतली आणि निघालो.

आम्ही सायंकाळी पाचच्या सुमारास विलेपार्लेला दुकानात गेलो. बरोबर सहा वाजता दादा दुकानात आले. जसजशी संध्याकाळ वाढत गेली, तसतशी दुकानाबाहेर लोकांची गर्दी वाढू लागली. विलेपार्ले स्टेशनपर्यंत प्रचंड अशी ती रांग होती. प्रचंड गोंगाट सुरू होता. पोलिसांना बोलावण्यात आलं. इन्स्पेक्टर आले. कशासाठी गोंगाट आहे म्हणून चौकशी केली तर रणजित देसाई आत दुकानात आहेत असं त्यांना समजलं. तेही दादांना भेटायला आले. त्यांनीही पुस्तक घेतलं व त्यावर दादांची सही घेतली. मग बाहेर येऊन सर्वांना शांत केलं. लोकांची तक्रार चालू होती, की ज्या ग्राहकांनी अगोदर पुस्तकनोंदणी केलेली आहे त्यांना अगोदर स्वाक्षरी द्या. त्यामुळं माझी खरोखरच पंचाईत झाली होती आणि मी अक्षरशः तोंड लपवून तिथून बाहेर पडलो होतो.

रात्री नऊपर्यंत आम्ही आणलेल्या त्या सर्वच्या सर्व पाचशे प्रती संपल्या आणि मी भोगलेंना सांगितलं की, ‘आणखी काही प्रती हव्या असतील तर वाचकांकडून नोंदणी करून घ्या. मी त्या तुम्हाला आठ दिवसांत पाठवतो आणि त्यांना तुम्ही तसं सांगा.’ त्याप्रमाणं भोगलेंनी रात्री बारा वाजेपर्यंत जवळजवळ सहाशे ते सातशे प्रतींची नोंदणी करून घेतली आणि मी तेवढी पुस्तकं आठ दिवसांनी पाठवली. अशा प्रकारचा वाचकांचा प्रचंड प्रतिसाद आणि उत्साह आजपर्यंत कोणत्याही पुस्तकाला लाभलेला नाही. दादांची ही लोकप्रियता बघून मीही भारावून गेलो.

त्यानंतर महिन्याभरातच जवळजवळ वीस हजार प्रती संपल्या. ‘श्रीमान योगी’साठी दादांनी खूप वाचन केलं होतं. त्यासाठी त्यांनी काढलेल्या टिपणांवरही खरं तर एक पुस्तक होऊ शकेल, इतकी टिपणं काढली होती; पण त्यांच्या पश्चात दुर्लक्ष होऊन ते कागद कुठं गेले ते आता शोधणं अवघड आहे.

### ***राधेय***

दादांचे साहित्य म्हणजे एक प्रकारे वाचकांशी उच्च भावनिक स्तरावर साधलेला कलात्मक संवादच होता. ‘राधेय’ ही महाभारतातील कर्णाच्या जीवनावरची कादंबरी. मराठीतील विद्वान लेखिका इरावती कर्वे यांना कर्ण

आवडायचा नाही. दुर्दैवानं जेव्हा ही कादंबरी प्रकाशित झाली तेव्हा इरावती कर्वे स्वर्गवासी झालेल्या होत्या. दादांनी ही कादंबरी हृद्य अंत:करणानं त्यांनाच अर्पण केली.

'राधेय' कादंबरीबद्दल दादांनी म्हटलंय की, 'प्रत्येकाच्या मनात एक कर्ण दडलेला असतो आणि माझ्या मनातील कर्णाची ही कहाणी आहे. हा कर्ण शोधायचा तर महाभारताची पाने चाळण्याचीही गरज नाही. आपल्या मनाची चार पाने उलटली तरी हा कर्ण दिसेल.'

या पुस्तकाचाच इतका प्रभाव की, मी 'राधेय' मधील काही वाक्यं घेऊन माझ्या मुलीच्या शर्मिलाच्या लग्नासाठी दादांकडून एक पत्र तयार करून घेतलं होतं. मी त्यांना विनंती केली होती की, 'लग्नाला आपल्याकडे येणारे जे पाहुणे आहेत त्यांना जाताना आपण काहीतरी भेटवस्तू देत असतो, तर आपण तुमचं पत्र भेट म्हणून देऊयात.' त्यांनाही ती कल्पना आवडली.

ते पत्र असं -




आदरणीय स्नेहीजन,

'निरोप कधीही मंद गतीने घेऊ नये. त्यानं दु:ख वाढतं. निरोप शक्य तेवढ्या लवकर द्यावा. राहा म्हटलं तर अधिकार गाजवल्यासारखं होतं. जा म्हटलं तर उपेक्षा भासते. मनाला येईल तसं कर म्हटलं तर उदासीनता दिसते.

एवढंच सांगावसं वाटतं, की आपण कुठेही असलो तरीही जेव्हा केव्हा आपल्याला



एकमेकांची आठवण येईल ती चांगल्या भावनेनं यावी, आठवणीनं भेटीचा आनंद वाढावा.'

हे पत्र मी उत्तमरीत्या छापून घेतलं व आलेल्या प्रत्येकाला निरोपादाखल दिलं. सर्व पाहुणे मंडळींना ते खूप आवडलं.

### *बारी*

आम्ही बऱ्याचदा कोल्हापूर-बेळगाव असा एकत्र प्रवास केला. या मार्गात सुतगट्टी नावाचं गाव आहे. तिथं खूप मोठं जंगल आहे, मी कधीतरी पाहिलंही होतं. त्या जंगलात बेरड जमातीचे दरोडेखोर राहत. तिथं दादांनी त्या दरोडेखोरांचा अभ्यास करून 'बारी' नावाची कादंबरी लिहिली. त्यासाठी ते दोन महिने दरोडेखोरांसोबत राहिले होते. त्यांची बोलीभाषा, तो परिसर, त्या लोकांच्या समजुती, स्वभाव या सर्व गोष्टींचं त्यांनी जवळून निरीक्षण केलं.

एकदा एखाद्या कादंबरीचा विषय ठरला, की त्या विषयाचा सखोल अभ्यास केल्याशिवाय दादा लिहीत नसत. वि. स. खांडेकरांनी जेव्हा ही कादंबरी वाचली, तेव्हा 'इतका मोठा आवाका असलेला विषय कोंदणात बसवलाय' या अर्थानं त्यांनी दादांचं खूप कौतुक केलं. त्यांनी त्या कादंबरीची तुलना 'वॉर ॲण्ड पीस' या कादंबरीशी केली. ही कादंबरी खरोखरच उत्कृष्ट अशी कादंबरी आहे. त्यांचे लेखनिक पांडुरंग कुंभार म्हणतात, 'या कादंबरीवर मात्र वाचकांनी अन्याय केलाय. तिचे जेवढे कौतुक व्हायला हवे होते, तेवढे झाले नाही.'

पांडुरंग कुंभार हे दादांच्या अतिशय जवळचे होते. लहानपणापासून दादांशी त्यांचा परिचय होता. एकदा ते वाड्यातल्या मुलांबरोबर क्रिकेट खेळत होते. दादांनी तेव्हा 'वेडात दौडले सात' ही पंचवीस पानांची दीर्घकथा लिहिली होती. ती दोन वेळा लिहून झाली होती; पण नंतर त्यांना ती पुन्हा नीट लिहून काढण्याचा कंटाळा आला होता.




दादांनी मुलांना विचारलं, 'कोणाचं अक्षर चांगलं आहे?'

पांडुरंग म्हणाला, 'माझं.'

दादा त्याला वाड्यात घेऊन गेले.

म्हणाले, 'ही कथा वाचून बघ. अक्षर लागतंय का. आणि लिहून काढ. सावकाश. चुका करू नकोस.'

तर त्यांनी ती ताबडतोब त्याच दिवशी लिहून पूर्ण करून दिली. दादांनी ती वाचली. खूश झाले. म्हणाले, 'पांडुरंगराव, तुमची-आमची कुंडली जमली आता. मी आता नवी कादंबरी घेतोय लिहायला. माझ्यासोबत थांबा तुम्ही.'

तेव्हापासून पांडुरंग कुंभार त्यांचे लेखनिक झाले. नंतर ते शिक्षक झाले; पण दादांचं सर्व साहित्य लिहून काढण्याचं काम शेवटपर्यंत त्यांनीच केलं. त्यामुळं दादांच्या साहित्याबद्दलचं त्यांचं मत मला अतिशय महत्त्वाचं वाटतं. आणि मलाही वाटतं, की 'स्वामी' व 'श्रीमान योगी' या कादंबऱ्या सोडल्या तर दादांच्या एकूणच वाङ्मयावर अन्याय झाला. 'स्वामी'नं त्यांच्या इतर सर्व साहित्याला गौण करून टाकलं. आणि 'श्रीमान योगी' मुळं 'बारी', 'माझा गाव', 'राजा रवि वर्मा' अशी बाकीची पुस्तकं मागं पडली.

### *राजा रवि वर्मा*


कथाकार, कादंबरीकार, नाटककार म्हणून प्रसिद्ध असलेले दादा चौफेर कलावृत्तीचे अवलिया होते. संगीतावर त्यांची अपार प्रीती होती. छायाचित्रं, जुन्या वस्तूंचा संग्रह करण्याचा त्यांना शौक होता. चित्रकलेवरही नितांत श्रद्धा होती.

सुप्रसिद्ध चित्रकार राजा रवि वर्मा यांच्या जीवनावरील कादंबरी लिहिण्यासाठी दादांनी त्यांच्या कलामय जीवनातील एकाएका घटनेसाठी, प्रसंगासाठी, प्रत्यक्ष त्यांच्या चित्रांचा अभ्यास करण्यासाठी खूप प्रवास केला. केरळमध्ये राजा रवि वर्मांच्या जन्मस्थळी ते गेले होते. तिथली त्यांची हातानं रेखाटलेली चित्रं त्यांनी आणली होती. इंग्लंडमध्ये राजा रवि वर्मांची मूळ चित्रं आहेत. औंध संस्थानच्या वस्तुसंग्रहालयातही त्यांची चित्रं आहेत. त्या प्रत्येक ठिकाणी ते गेले होते. त्या वेळी मलाही त्यांनी सोबत नेलं होतं. एखाद्या कलाकारावर पुस्तक लिहायचं तर किती कष्ट करावे लागतात याचं ते माझ्यासमोरचं उत्तम उदाहरण आहे.

लोणावळ्याजवळ कार्ल्याला राजा रवि वर्मा यांचा प्रेस होता. तो बघायला दादांनी मलाही नेलं होतं. राजा रवि वर्मांनंतर तो प्रेस दुसऱ्यानं कोणीतरी विकत घेतला होता. मग तिसऱ्यानं. त्या काळात चित्र सुलट यावं म्हणून दगडावर चित्र उलटं उमटवलं जात असे. आता ते सगळं भग्न

अवस्थेत आहे; पण उत्तम चित्र असलेले दगड अजूनही तिथं आहेत. त्या जुन्या शिळा व प्रिंटिंगचं ते काम पाहून त्या काळातलं ते मोठं आश्चर्यच वाटलं मला.

दादांनी 'राजा रवि वर्मा' कादंबरी लिहून पूर्ण केली. भारतीय चित्रकलेला एक वेगळे वळण लावणाऱ्या थोर चित्रकाराच्या जीवनाचे कलात्मक व भावात्मक दर्शन ही कादंबरी घडवते. त्यातून नकळतपणे दादांमधल्या कलावंताचे व माणूसपणाचेही दर्शन घडते. दादांनी मला ही कादंबरी दिली आणि मी कामाला लागलो. भारताचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते ८ एप्रिल, १९८४ रोजी दादांच्या वाढदिवशी कोवाडला या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ करायचा असं ठरवलं.




पण, मला या कादंबरीचं मुखपृष्ठ दादांच्या त्या कष्टांना न्याय देणारं अप्रतिम दर्जाचंच असावं वाटत होतं. मुखपृष्ठाचा मी खूप विचार करत होतो व समारंभाची तारीख तर जवळ येऊ



लागली होती. नुकतंच नानी पालखीवाला यांचं 'वुई दि पीपल' या पुस्तकाचं अप्रतिम बाइंडिंग मुंबईत टाटा प्रेसमध्ये केलं होतं. ते हार्डबाउंड होतं. पुस्तकाचं कव्हर काढल्यानंतर आतली जी बायंडिंग केलेली बाजू होती, त्याचं टेक्श्चर मला फार आवडलेलं होतं. ते माझ्या डोळ्यांसमोर आलं व लगेच मी रविमुकुल या आमच्याकडील मुखपृष्ठकाराला तसं सांगितलं, की 'वुई दि पीपल' चं बाइंडिंगचं कव्हरचं टेक्श्चर खाली वापरू आणि वर राजा रवि वर्मा ही अक्षरं सोनेरी रंगात छापू. त्यांनाही ती कल्पना आवडली. त्याप्रमाणं रविमुकुल यांनी टेक्श्चर तयार केलं आणि आम्ही दोघं टाटा प्रेसमध्ये मुंबईला गेलो. बाइंडिंगसाठी सोबत आम्ही पाच पुस्तकं नेली होती. तिथल्या मॅनेजरनं त्याचा खर्च १८ रुपये सांगितला. तो परवडण्यासारखा नव्हता. तरीही मी विनंती केली, की २०-२५ प्रतींना तुम्ही बाइंडिंग करून द्याल का? रणजित देसाईंच्या लिखाणावर त्यांचंही प्रेम होतं. ते कबूल झाले. मग आम्ही २५ प्रती बाइंडिंग करून घेतल्या.

त्या वेळी मुखपृष्ठांची उत्तम छपाई जंगम यांच्याकडं होत असे. आम्ही त्यांच्याकडं गेलो. त्यांना लगेच आमचं काम करणं शक्य नव्हतं; पण आम्हाला त्याच दिवशी रात्री कोवाडला जायचं होतं. दुसऱ्या दिवशी अकरा वाजता प्रकाशन समारंभ होता. त्यांना विनंती करून त्यांच्याकडून आम्ही पंधरा-वीस प्रती तयार करून घेतल्या. त्यात रात्रीचे तीन वाजले. त्यानंतर सकाळी पाच वाजता पुण्याहून गोव्याला निघालो व तिथून कोवाडला पोहोचलो.

या प्रकाशन समारंभासाठी कोल्हापूर व पुण्यातून बरीच मंडळी आली होती. कोवाडच्या जवळच अर्धा किलोमीटर अंतरावर एक मोठं पठार आहे. तिथं दादांच्या नावानं 'रणजित नगर' म्हणून नवी वसाहत स्थापन करण्याची सरकारी योजना होती. तिचं उद्घाटन यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते करण्यात आलं. त्यानंतर 'राजा रवि वर्मा' या पुस्तकाचं यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते शानदार प्रकाशन झालं. पुस्तकाचं बाइंडिंग बघून दादा अतिशय खूश झाले. म्हणाले, 'माझ्या आतापर्यंतच्या सर्व पुस्तकांमध्ये हे सर्वांत सुंदर झालंय.'

त्यांनी मला शाबासकी दिली. मला फार समाधान वाटलं. त्या प्रसंगी माधवीताईंनी जे भाषण केलं ते अप्रतिम होतं. मला प्रथमच त्यांची वक्तृत्वकला व त्यांचे साहित्यविषयक विचार समजले.

## *दादांचे कथासंग्रह व नाटकांविषयी ...*

'स्वामी', 'श्रीमान योगी', 'राधेय' या कादंबऱ्यांमुळं दादा जवळपास प्रत्येक मराठी वाचकापर्यंत पोहोचले; पण एकाच साहित्य प्रकारात ते अडकले नाहीत. त्यांनी कथा व नाटकंही लिहिली होती. 'कणव' आणि 'जाण' हे दोन्ही कथासंग्रह पूर्वी देशमुख प्रकाशनाने छापले होते. आम्ही ते पुन्हा प्रकाशित करायचे ठरवले; पण आता त्यांच्या किमती आणखी वाढल्या असत्या; कारण ते कथासंग्रह जवळजवळ ३०० ते ३५० पानांचे होते. वाचकांना ते विकत घेताना परवडायलाही हवे. काय करावे? उपाय सुचला. आम्ही कमी पृष्ठसंख्या करायची ठरवली आणि ते काम आम्ही प्रा. कमलाकर दीक्षितांवर सोपवलं. त्यांनी त्यातील ग्रामीण कथा, प्रणय कथा, संगीतावरील कथा अशा स्वतंत्र करून विषयानुरूप त्याची पुस्तकं करूयात, वाचकांना तसं वाचायला आवडेल, असं दादांना सुचवलं. दादांनी ताबडतोब होकार दिला आणि 'कणव' व 'जाण' ही दोन्ही पुस्तकं आम्ही 'मेघ', 'वैशाख', 'आषाढ', 'प्रपात', 'बाबुलमोरा', 'संकेत' या सहा पुस्तकांत विभागून प्रकाशित केली. वाचकांनी या पुस्तकांचे छान स्वागत केले; कारण मला वाटतं, की दादांच्या सर्वच कथा या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांच्या कथा या त्या-त्या प्रदेशापुरत्या न राहता त्या सर्वव्यापी बनतात. त्यांची कथाकथनाची शैली सरळ पण अतिशय आकर्षक आहे. तिला उपमा-अलंकाराचा सोस नाही. जे त्यांना दिसलं-भावलं त्याचं त्यांनी चित्रमय शैलीमध्ये अत्यंत वाचनीय असं चित्रण केलेलं आहे.

दादांची प्रतिभा चौफेर होती. त्यांनी काही नाटकेही लिहिली; मात्र ती प्रत्येक वेळी त्यांनी स्वयंस्फूर्तीनं लिहिली असं नव्हे. दादांचे एक मित्र होते. बेळगावातील वरेरकर संस्थेचे ॲड. दौलत मुतकेकर म्हणून. ते रंगभूमीवरील त्या काळातील मोठे हौशी कलाकार होते. उत्तमोत्तम भूमिका करण्यात त्यांना रस होता. तशी भूमिका करायला मिळावी म्हणून ते तशा आगळ्यावेगळ्या भूमिकेचे नाटक लिहा म्हणून दादांच्या सतत मागे लागत. त्यासाठी कोवाडला मुक्काम करून राहत. दादाही त्यांनी सांगताच रात्र-रात्र जागून दोन दिवसांत नाटक लिहून देत. 'धन अपुरे,' 'पंख जाहले वैरी', 'पांगुळगाडा', 'रामशास्त्री', 'लोकनायक', 'वारसा', 'सावली उन्हाची', 'संगीतसम्राट तानसेन', 'हे बंध रेशमाचे' अशी बरीच नाटकं दादांनी खास त्यांच्यासाठी म्हणून लिहून दिली. आणि दौलत मुतकेकर यांनीही नाटकातील त्या-त्या

भूमिकेचे अक्षरश: सोने केले. शिवाय पूर्वी नाटके वाचली जात. आज लोकांना नाटकाचं वेड कमी झालंय; पण दादांची नाटकं आजही वाचली जातात. त्याची विक्री कायम असते.

त्यातलं 'गरुडझेप' नावाचं नाटक दादांनी  वसंत कानेटकरांसह लिहिलं होतं. तसेच प्रसिद्ध नाट्य निर्माते व दिग्दर्शक मोहन वाघ यांनी 'स्वामी' या कादंबरीवरून दादांकडून नाटक लिहून घेतलं होतं. त्याचा पहिला प्रयोग पुण्यात मोठ्या थाटामाटात शनिवारवाड्याला लागला होता. या प्रयोगाचा प्रचंड गाजावाजा झाला होता. नाटक होण्यापूर्वी आणि नंतरही.

### ***दादांमधला साधा, सुवासिक माणूस***



दादा गावाचे इनामदार होते. त्यांच्या राहणीत थाट असायचा. त्यांचे कपडे, त्यावरील सोन्याची बटणं अगदी बघण्यासारखी असायची. त्यांना वेगवेगळे सेंट वापरायला आवडायचे; पण असे असले तरी गावात ते अत्यंत साधे कपडे घालत. हाफ पॅन्ट व टी. शर्ट. घरी बंडी व लुंगी घालत. आणि  त्यांची वागणूक तर त्याहूनही अगदी साधी असे. कोवाडला दादांकडे मी पहिल्यांदा गेलो, तेव्हा संध्याकाळी आम्ही दादांच्या शेतावर चालत फिरायला निघालो होतो. तर समोरून आम्हाला दुसरी-तिसरीतल्या शाळकरी मुली शाळेतून परतत असताना दिसल्या. त्या दादांना नमस्कार करून पुढे जात होत्या. त्यातल्या एका मुलीची वेणीची रिबीन सुटलेली होती. ती आपल्याच नादात होती. दादांनी तिला प्रेमानं थांबवलं व रस्त्यावर गुडघा टेकवून त्या मुलीची रिबीन बांधली. मग तिला 'जा' म्हणून सांगितलं. त्यांच्यासोबतच्या त्या पहिल्या भेटीतच मला त्यांच्यातला प्रेमळ माणूस लक्षात आला. एवढा मोठा माणूस गावातल्या माणसांशी किती आत्मीयतेनं वागतो, हे मी त्यानंतरही अनेकदा जवळून अनुभवत गेलो व प्रत्येक वेळी स्तिमित झालो.

त्यांच्याविषयी गावात अतिशय आदर होता. ज्या वेळी त्यांना 'पद्मश्री'

पुरस्कार मिळाला, त्या वेळी एकवीस बैलगाड्यांतून गावात त्यांची मिरवणूक काढण्यात आली होती. गावात खूप मोठा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. खरोखरच तो दिवस कोवाडवासीयांनी एखादा सण साजरा करावा तसा साजरा केला होता; कारण दादांमुळं कोल्हापूर जिल्ह्यातील 'कोवाड' हे अगदी छोटंसं गाव महाराष्ट्राच्या नकाशावर आलं होतं!

दादांना प्राण्यांबद्दल खूप प्रेम होतं. मी पहिल्यांदा जेव्हा रात्रीच्या वेळेस दादांकडं गेलेलो तेव्हाच त्यांचं प्राणिप्रेम माझ्या लक्षात आलं. त्या वेळी त्यांच्या घरात दोन कुत्र्याची पिल्लं मी पाहिली आणि सकाळी उठून बाहेर अंगणात आलो, तर तिथं बदक, रॉबर्ट नावाचा पक्षी, पोपट वगैरे बरेच पक्षी व प्राणी होते. दादांकडं एक कुत्रा होता. ते कायम त्याला आपल्याबरोबर जेवायला घेऊन बसत. जेवता-जेवता त्याच्याही तोंडात घास घालत. रात्री ते त्यांच्या अंगावर उड्या मारे. ते पाहून मला आश्चर्य वाटायचं. त्यांचे लेखनिक पांडुरंग कुंभार यांनी त्या कुत्र्याविषयी एक आठवण सांगितली आहे, 'ते जेव्हा 'श्रीमान योगी' लिहीत होते, तेव्हा ते त्या कुत्र्याला लिहून झालेलं प्रत्येक प्रकरण वाचून दाखवत व मगच ते फाइलमध्ये ठेवत. एकदा एक प्रकरण वाचून झाल्यानंतर दादांच्या हातातले ते कागद काढून घेऊन त्या कुत्र्यानं खाऊन टाकले. याचा अर्थ, हे प्रकरण कुत्र्याला आवडलं नाही. ते नीट लिहून झालं नाही, असा अर्थ काढून त्यांनी ते प्रकरण पुन्हा नव्यानं लिहिलं.' हे सगळं ऐकलं तेव्हा मला खूप चमत्कारिक व गमतीशीर वाटलं.

असा हा माणूस त्यांच्या साहित्यामुळं हळूहळू माझ्या जीवनात येत होता. मला त्यांचं प्रेम मिळालं. सहवास मिळाला. त्यातून आणखी कितीतरी थोरामोठ्यांचाही सहवास मिळत गेला. त्यांच्या काही आठवणी सांगतो.

माधवीताई या दादांच्या दुसऱ्या पत्नी. पुढे त्यांनीही अनेक पुस्तकं लिहिली. मराठी साहित्यात त्यांची अशी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. दादांमुळं त्यांचाही सहवास मिळाला. माधवीताईंमुळं दादांच्या घराला घरपण आलं होतं. त्या आतिथ्यशील होत्या. आणि ही गोष्ट मी कोवाडला त्यांच्याकडं ज्या वेळी पहिल्यांदा गेलो होतो, तेव्हाच लक्षात आली होती. त्या वेळी संध्याकाळ झाली होती. माधवीताईंनी स्वयंपाक करून ठेवला होता; पण ते जेवण मांसाहारी होतं. मी मांसाहार करत नाही हे त्यांना माहीत नव्हतं. मी त्यांना 'साधा भात किंवा दही-भाकरी द्या, मी खाईन.' म्हटलं आणि मी

दही, भाकरी, भात खाल्ला; पण माधवीताईंना खूप वाईट वाटलं. नंतर मी ज्या-ज्या वेळी कोवाडला जात असे, त्या त्या वेळी त्या बेळगाववरून आवर्जून भाजी आणत असत; कारण तिथं ताजी भाजी फारशी मिळत नसे. कोवाडला गेलो की त्यांचा राहण्याचा व जेवणाचा आग्रह मी कधीही मोडू शकत नसे.

दादांइतकंच माधवीताईंनीही माझ्यावर इतकं प्रेम केलं की मी ते कधीच विसरू शकत नाही. नकळतपणे ते दोघंही माझ्या आयुष्याचा फार मोठा भाग बनत गेले.

दादांना व माधवीताईंना शास्त्रीय संगीतात रस होता. दादांकडं अनेक गायक आवर्जून येत व त्यांच्याकडे मैफली करत असत. वसंतराव देशपांडेंची व त्यांची गहिरी मैत्री होती. त्यांच्याविषयीही एक आठवण माझ्याकडं आहे.

आठ एप्रिल म्हणजे दादांचा वाढदिवस. मी न चुकता सकाळी आठ वाजता त्यांच्या दारात त्यांना शुभेच्छा देण्यासाठी हजर असायचो. त्यांना पहिला पेढा खाऊ घालायचो आणि मग बाकीच्यांना वाटायचो. एका वाढदिवसाला असाच मी त्यांच्या घरी गेलो. त्यांना शुभेच्छा दिल्या. दुपारचं जेवण झालं; पण त्या दिवशी ते मला काही केल्या सोडेनात. 'थांब थांब' करत संध्याकाळ झाली. सगळा वाडा शांत झाला. मी, दादा, माधवीताई,



त्यांचे लेखनिक पांडुरंग कुंभार व पुंडलिक नावाचा त्यांचा आचारी एवढेच होतो. पुंडलिक स्वयंपाकात मग्न होता. आम्ही गप्पा मारत बसलेलो. आणि दादांनी आपल्याला का थांबवून घेतलं ते मला कळलं. दादांनी मला सांगितलं की, रात्रीच्या जेवणासाठी वसंतराव देशपांडेंना निमंत्रण दिलं आहे. वसंतराव देशपांडे म्हणजे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील,विशेषतः, मराठी संगीत रंगभूमीवर महत्त्वपूर्ण योगदान देणारे ख्यातनाम गायक आणि अभिनेते. 'कट्यार काळजात घुसली' हे संगीत नाटक त्यांनी साकारलेल्या खाँसाहेबांच्या भूमिकेमुळं अजरामर झालं. सर्व प्रकारच्या गायकीवर त्यांचं प्रभुत्व होतं. इतकी मोठी व्यक्ती येणार म्हटल्यावर मी मुक्कामी न राहण्याचा प्रश्नच नव्हता. माझ्यासाठी ती रात्र खरोखरच संस्मरणीय ठरणार होती.

दादांनी वसंतराव येण्यापूर्वी तंबोरे जुळवून ठेवले होते आणि मला सांगून ठेवलं होतं, 'वसंतरावांना गाणं म्हणायला सांगायचं नाही.' संध्याकाळी सात वाजता वसंतराव देशपांडे आले. गप्पांची छान मैफल रंगली. आणि काहीतरी निमित्त मिळालं. दादा गाऊ लागले. 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख....' माधवीताईदेखील त्यांना साथ देऊ लागल्या. त्या दोघांचाही आवाज सुंदर होता. गाणं ऐकताना सगळेच मंत्रमुग्ध झालो; पण गातागाता एका ठिकाणी कुठंतरी ते चुकले. त्यांनी वेगळाच सूर लावला. मुद्दाम चुकले असावेत असा माझा अंदाज आहे. त्यावर वसंतराव चिडले.

'तुम्हा दोघांनाही गाणं म्हणता येत नाही, मी म्हणतो,'

असं म्हणत त्यांनी तंबोरा घेतला व गायला सुरुवात केली आणि गाण्याची ती सुरेल मैफल रंगत गेली. पहाटे चार वाजेपर्यंत मी, दादा व माधवीताई आम्ही भान हरपून ऐकत होतो. माझ्यासाठी ती रात्र म्हणजे खरोखरच मंतरलेली होती. पहाटेपर्यंत कोणाला जेवायचीदेखील आठवण झाली नाही. शेवटी मैफल संपल्यावर दादांनी पुंडलिकला जेवण गरम करायला सांगितलं आणि पहाटे चार वाजता जेवण करून मग आम्ही झोपलो.

सुप्रसिद्ध संगीतकार सी. रामचंद्र आणि दादांचीही घनिष्ठ मैत्री होती. त्यांच्या मैत्रीचीही एक मजेशीर आठवण माझ्याकडं आहे. सी. रामचंद्र कोवाडला आले की आठ-आठ दिवस दादांच्या घरी राहत असत. तसेच दादा पुण्यात येत, तेव्हा ते बऱ्याचदा एका ठरलेल्या लॉजमध्ये उतरायचे आणि तिथली त्यांची खोलीही ठरलेली असायची. त्याचं कारणही सी. रामचंद्र;

कारण त्या खोलीच्या मागच्या गॅलरीतून सी. रामचंद्र यांचा बंगला दिसत असे. सकाळी खोलीत पोहचले, आवरून झाले की साधारणपणे दहाच्या सुमारास ते तिथूनच त्यांना हाक मारायचे. 'अरे म्हाताऱ्या, ये, आता सकाळ झाली.' मला खूप हसायला येई. सी. रामचंद्र आले की त्यांच्या गप्पा सुरू होत. मला त्यांच्या गप्पा ऐकायला मिळत.

एकदा मी व दादा थेऊरवरून परतत होतो, तेव्हा प्रा. कमलाकर दीक्षित आमच्या सोबत होते. दादा त्यांना चेष्टेनं, 'हा माणूस माझा शत्रू आहे; कारण तो माझ्या पुस्तकातल्या चुका काढतो.' असं म्हणत. त्यावर खूप हास्यविनोद होत. कमलाकर दीक्षित प्राचार्य म्हणून त्या वेळी कोकणात देवरूख या गावी होते. त्यांनी दादांना 'आमच्या कॉलेजच्या स्नेहसंमेलनाला पाहुणे म्हणून याल का?' अशी विनंती केली. त्या वेळी दादांनी लगेच उत्तर दिलं, 'अरे, विचारतोस काय, तारीख सांग. मी येतो.' आणि आमचा कोकण दौरा ठरला.

पुण्याहून मी, दादा व बाबा पाटील जे त्या वेळेस आमचे संपादक व मुद्रितशोधक होते, असे तिघं निघालो; पण गणपती उत्सवाचा तो काळ असल्यानं आम्हाला टॅक्सी मिळत नव्हती. एका बॅन्डवाल्याचं नाव मला कुणीतरी सुचवलं. मी त्यांना विचारलं. तर ते लगेच तयार झाले व स्वत:च आमच्या सोबत ड्रायव्हिंग करत निघाले.

नंतर मी त्यांना विचारलं, 'तुम्ही त्वरित हो कसे म्हणालात?'

त्यांनी उतर दिलं, 'मी थेऊरच्या गणपतीचा पुजारी आहे आणि रणजित देसाईंची 'स्वामी' कादंबरी मी वाचली आहे. मी 'स्वामी'कारांना नाही म्हणूच शकत नाही.'

गाडी सुरू होताच दादा म्हणाले, 'सातारा आलं की आपण गावातून जाऊया.'

आम्ही म्हटलं, 'का?

तर ते म्हणाले, 'कारण कोकणात भाजी वगैरे मिळणार नाही. तिथं दीक्षितांना त्रास द्यायला नको. आपणच नेऊयात भाजी.'

आम्ही साताऱ्यात गाडी थांबवली. दादांनी स्वतःच भाजी खरेदी केली. मंडईहून भाजी वगैरे घेऊन मग निघालो. अशा प्रसंगातून माणसांचा दादा किती बारीकसारीक विचार करत हे लक्षात यायचं.

देवरुखला आम्ही पोहोचलो. कार्यक्रम छान झाला. तोपर्यंत देवरुखला एवढा मोठा साहित्यिक आल्याचं लोकांना माहीत नव्हतं. कमलाकर

दीक्षितांच्या मैत्रीमुळं हे शक्य झालं. दादांचं साधेपण हे खरोखर वेगळं होतं. त्यांना निमंत्रण, मानपान असं काही लागायचं नाही. आणि मित्र म्हटल्यावर तर ते मागं-पुढं काही पाहायचे नाहीत.

एक दिवस आम्ही दोघेच बेळगावहून कोल्हापूरला येत होतो, त्या वेळी मी दादांना म्हटलं, ''स्वामी', 'राधेय' व 'श्रीमान योगी' या तुमच्या कादंबऱ्या माझ्या वडिलांच्या आवडत्या कादंबऱ्या होत्या.' ते त्यांनी लक्षात ठेवलं होतं आणि एकदा निपाणीला ते घरी आले होते. दुर्दैवानं त्या वेळी वडील हयात नव्हते. अन्यथा त्यांना दादांसारख्या लेखकाचा प्रकाशक आपला मुलगा आहे, हे पाहून अतिशय अभिमान वाटला असता. मी आईची व त्यांची ओळख करून दिली. त्यांनी माझ्या आईला वाकून नमस्कार केला आणि 'तुम्ही माझ्यासाठी आई आहात' असं म्हणाले. माणसाला जवळ करून त्याच्याशी कसं घट्ट नातं जोडायचं हे त्यांच्याकडून खरोखरच शिकण्यासारखं होतं.

दादा जेव्हाही कोल्हापुरात यायचे तेव्हा पूर्ण वेळ मी दादांसोबतच असायचो. काही वेळेला दादांसोबत माधवीताईसुद्धा असत. ती दोघं हॉटेल इंटरनॅशनलला उतरत. तिथं मला बोलावून घेत. पावसाळ्याच्या दिवसांत एकदा दादा व माधवीताई कोल्हापूरला आले होते. दुपारी आम्ही एकत्रच जेवण केलं.

जेवणं झाल्यावर दादा म्हणाले, 'आज आपण पन्हाळ्याला जाऊया. आणि आम्ही लगेच गाडीनं निघालो. तीन-चारपर्यंत पन्हाळ्याला पोहोचलो. संपूर्ण गडावर आम्ही फिरलो. गडाची दादांना इत्थंभूत माहिती होती. लताबाईंचा बंगला त्यांनी मला दाखवला. गडावरून फिरता फिरता वेळ कसा गेला काही कळलंच नाही. संध्याकाळ झाली. अन् अचानक धो-धो पाऊस सुरू झाला. आम्ही कड्याचा आसरा घेतला.

दादा म्हणाले, 'आज रात्री आपण इथं पन्हाळ्यावरच मुक्काम करूयात.'

मलाही ती कल्पना अतिशय आवडली. मी घरी तसं कळवलं. आम्ही गव्हर्नमेन्ट रेस्ट हाउसमध्ये गेलो. त्या वेळी दादांना नुकतीच 'पद्मश्री' मिळाली होती. 'स्वामी'कार रणजित देसाई अतिशय लोकप्रिय होते. तिथल्या लोकांनी बरीच सरबराई केली. त्यांनी आम्हाला एक मोठा व्हीआयपी सूट दिला. त्यातील एका रूममध्ये माधवीताई व दादा अन् एका रूममध्ये मी

राहिलो; पण नेमक्या त्या दिवशी रेस्ट हाउसमध्ये दोनच जाड रग शिल्लक होते. ते त्यांनी माधवीताई व दादांना दिले व मला एक साधी चादर दिली. रात्री उशिरापर्यंत आम्ही गप्पा मारल्या अन् मग आपापल्या रूममध्ये जाऊन झोपलो. थोड्याच वेळात दादा माझ्या रूममध्ये आले. त्यांनी त्यांचा रग माझ्या अंगावर पांघरला. पांघरताना म्हणाले, 'आम्ही एकाच रगमध्ये झोपू. हवेत चांगलाच गारठा आहे.' आणि सावकाश दरवाजा ओढून ते आपल्या रूममध्ये गेले.

त्यांना माझी सवय माहीत होती, की कुमारला साध्याशा पातळ चादरीत झोप लागणार नाही. तो प्रसंग मी कधीच विसरणार नाही. मला भरून आलं. रात्री कितीतरी वेळ त्यांनी माझ्या अंगावर मायेनं घातलेल्या रगच्या उबेत त्यांचा विचार करत राहिलो...!

कधी कधी ते अचानक कोल्हापूरला घरी यायचे आणि माझ्या बायकोला अंजलीला म्हणायचे, 'चल, वाढ लवकर. चांगलीच भूक लागलीय.'

अंजली म्हणायची, 'बसा तुम्ही. तुम्ही येणार हे माहीत नव्हतं. मी गरम गरम करते, अन् लगेच वाढते.'

त्यावर ते म्हणायचे, 'म्हणजे कुमारनं तुला सांगितलं नाही का मी जेवायला येतोय ते?'

त्यावर मी चक्रावून जायचो. चेष्टा करायची, भांडणं लावायची असाही त्यांचा गमतीशीर स्वभाव होता. त्यांना माझ्या पत्नीच्या हातचं जेवण खूप आवडायचं. अंजलीनं केलेली हातपुडी त्यांना आवडत असे.

पुण्यात माझा फ्लॅट होता. तिथं त्या वेळी लेखक, कलाकार मंडळी येत. माझी मुलं सुनील व शर्मिला, पुतण्या मनोज कॉलेजच्या हॉस्टेलला राहत; पण तीही कधी कधी तिथं येत. तिथंच राहत. दादा पुण्यात आले की काही वेळा तेही राहत.

तेव्हा आम्ही समोरच्या हॉटेलमधून चहा, नाष्टा मागवायचो. गप्पा, चर्चा होत. गमतीजमती घडत. आमच्या तिथल्या सहकाऱ्यांसोबतही त्यांचं मस्त जमायचं. दादांना पान खायचं वेड होतं. त्यांच्याकडं वेताचा एक डबा होता. त्यात ते पानं ठेवत. एकदा त्यातली पानं संपलेली, तर त्यांनी तिथल्या ठोंबरे नावाच्या मुलाला पानं आणायला सांगितले. तर तो बाहेर जाऊन त्या वेळच्या आमच्या व्यवस्थापिका हर्डीकरबाई यांना म्हणाला, 'दादांना केळीची पानं हवी आहेत.' त्यांना काही कळेना. त्यांनी सरळ आत येऊन दादांना विचारलं,

'तुम्हाला कसली पानं हवीत? केळीची का?'

त्यावर दादा वैतागून म्हणाले, 'तुमच्या स्टाफला काही अक्कल वगैरे आहे की नाही?' त्या वेळी आमची सर्वांची हसून हसून पुरी वाट लागलेली. दादाही खूप हसले.

एकदा हॉटेलचा संप होता. त्या वेळी माझी मुलगी शर्मिला उत्साहानं म्हणाली, 'आज मी सर्वांसाठी उप्पीट बनवते.'

आमचे संपादक बाबा पाटील तिथंच फ्लॅटवर राहायचे. त्यांनी तिला मदत केली आणि गरम गरम उप्पीट बनवून तिनं त्या डिशेस आमच्यासमोर ठेवल्या. दादांनी डिश हातात घेतली. एक घास खाल्ला आणि म्हणाले, 'अगं हे उप्पीट नाही, 'टोमॅटो उप्पीट' आहे.'

त्या वाक्यावर सगळे मनमुराद हसले. आजही तो प्रसंग आठवला की मला हसू येतं; कारण त्या डिशमध्ये रवा कमी आणि टोमॅटो अधिक होते!

मुलं फ्लॅटवर असली की त्यांच्यासोबत दादा अगदी रमून जात. माझ्या दोन्ही मुलांवर त्यांचं प्रेम होतं. त्यांच्याबद्दल ते नेहमी विचारपूस करत. प्रथम भेटीत एकदा ते आले असताना माझ्या मुलांनी दादांना नुसताच नमस्कार केला. तेव्हा त्यांनी मोठ्यांना वाकून नमस्कार करायचा असतो अशी शिकवण दिली. मुलांनी ती शिकवण कायम जपली.

माझ्या मुलीचं शर्मिलाचं लग्न ठरलं, तेव्हा त्यांनी आम्हा पती-पत्नीला केळवणासाठी बेळगावला बोलावलं होतं. तेव्हा त्यांच्या मुली शिक्षणासाठी तिथं राहत होत्या. माधवीताई मुलींच्यासोबत राहायच्या व दादा कोवाडहून जाऊन-येऊन असत. आम्हाला तिथंच बोलावलं होतं. तेव्हा माधवीताईंनी माझ्या पत्नीला सुंदर साडी घेतली होती. शर्मिलाला पाकिटात अहेर केला होता. तरीही दादांचं मन मात्र भरलं नव्हतं.

त्यांनी मला विचारलं, 'मला तुलाही काही द्यायचं आहे. तुला मी काय देऊ?'

मी विनम्रतेनं म्हणालो, 'तुमचं एवढं सारं प्रेम हेच माझ्यासाठी खूप आहे.'

ते ऐकूनच घेईनात. शेवटी त्यांनी अंगठ्यांचा एक बॉक्स काढला. त्यामध्ये हिरे, पाचू, माणिक नाना प्रकारच्या जवळजवळ तीस-पस्तीस अंगठ्या होत्या.

त्यांनी मला सांगितलं, 'यातली तुला आवडेल ती घे.'

मी त्यांना माझे दोन्ही हातांचे पंजे दाखवून म्हणालो, ‘माझ्या प्रत्येक बोटात अंगठी आहे. मला यातील एकही नको.’

त्यांना प्रथम कळेना, की एकाही बोटात अंगठी नसूनही हा असं का म्हणतोय.

मग मी म्हणालो, ‘तुमची पुस्तकं याच माझ्या अंगठ्या आहेत.’

त्यावर ते प्रेमानं रागावले आणि मग त्यांनी त्यातून बिन डाग असलेली एक जाडजूड अंगठी स्वतःच निवडली व ती मला दिली. त्या अंगठीमागील कथाही सांगितली. ते पंढरपूरला अनेकदा जात. नवीन पेन व नवीन वही घेऊन मंदिरात बसत. तिथं एखादं पान लिहून लेखनाची सुरुवात करत. कधी कधी तिथं बसून भजनंही गात. हे एका सोनारानं बघितलं होतं. त्यानं दादांची ‘स्वामी’ कादंबरी वाचली होती. एकदा त्यानं दादांना आपल्या घरी जेवायला बोलावलं व त्या वेळी ही एकही डाग नसलेली अंगठी दादांना भेट म्हणून दिली होती. ती अंगठी शर्मिलाच्या केळवणानिमित्त दादांनी मला भेट म्हणून दिली. अजूनही मी जपून ठेवली आहे.

शर्मिलाच्या लग्नात दादा अनेक गोष्टीत स्वतः जातीनं लक्ष देत होते. त्या वेळी ते माझे लेखक नव्हते तर वडिलांसारखे होते आणि माधवीताईसुद्धा. एक पंगत माझ्या सर्व लेखकांची बसली होती, त्या वेळी दादा लेखकांना आग्रह करून वाढण्यास मदत करत होते. या वेळी इतका मोठा लेखक आपल्याला आग्रह करत आहे याचं सर्वांनाच आश्चर्य वाटत होतं.

‘समिधा’ कादंबरीपासून दादा आमच्या घरचेच एक सदस्य झाले होते. गंमत म्हणजे दुकानातीलसुद्धा. कोल्हापुरात आले की पाच-सहा दिवस राहत. दुकानात रोज येत. माधवीताई व दादा वेगळे झाल्यानंतर शेवटी शेवटी तर ते कोल्हापुरातच जास्त राहत. त्यांच्या दोन्ही मुली मधू किंवा पारू कोल्हापूरला असत. दादा त्यांच्याकडं राहायला असत. त्या वेळी त्या दोघींशी व त्यांच्या कुटुंबीयांशी माझा चांगला परिचय झाला. आजही त्या दुकानाच्या साइडला कुठं कामासाठी आल्या की भेटून जातात.

दादांचं इंग्रजी व मराठी दोन्ही भाषेतलं वाचन अफाट होतं. त्यांची स्वतःची लायब्ररी होती. मला असं वाटतं, बंगाली कादंबरीकार शरदबाबू यांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. त्यामुळं आपल्या मुलींची नावंही त्यांनी त्यांच्या कादंबरीतील पात्रांची नावं म्हणजे मधुमती आणि पार्वती म्हणजे पारू अशी ठेवली.

दादा त्या वेळी सकाळी साडेनऊच्या सुमारास ‘मेहता बुक सेलर्स’ या आमच्या दुकानात येऊन बसत. गप्पा मारत. काही वेळेला त्यांच्यासमोरच एखादा ग्राहक येई व ‘स्वामी’ किंवा ‘श्रीमान योगी’ मागे, तेव्हा त्यांना आनंद होई. तेव्हा ते हळूच माझ्याकडं पाहत व डोळा मारत. ‘बघ बघ, माझं पुस्तक जातंय.’ अशा अर्थानं. त्या ग्राहकाला इथं बसलेले हे गृहस्थच रणजित देसाई आहेत हे माहीत नसे. मी त्याला दादांची ओळख करून देत असे. त्या ग्राहकाला खूप आनंद होई व आत येऊन तो दादांना नमस्कार करे. त्यांची स्वाक्षरी घेई. दादांनाही आपल्या वाचकाला खूश करण्यात आनंद वाटे.

साधारण अकरा वाजता आमच्या सहकारी संगोराम मॅडम आल्या की मग दुकानातून उठत ते हसत-हसत म्हणत, ‘काय हे बाई, किती उशीर केलात? तुमच्यामुळं मला इथं थांबावं लागतं.’ मग माझ्याकडं वळून पाहत म्हणत, ‘ठीक आहे, येतो मी. या पगारी नोकर, मी बिनपगारी नोकर. चाललो मी आता. पगारी नोकर आता काम बघतील.’ आणि मग ते दुकानातून बाहेर पडत. ‘मी बिनपगारी आहे. तुम्ही पगारी आहात,’ असं ते कायम संगोराम मॅडमना म्हणत. त्या आजही ती आठवण काढतात.

दादांची एकसष्टी १९८९ साली मी कोल्हापूरला केशवराव भोसले सभागृहात साजरी केली होती. त्या वेळी बाबासाहेब पुरंदरेंच्या हस्ते दादांचा सत्कार ठेवलेला होता. माधव गडकरी, शान्ताबाई शेळके, आनंद यादव, शरद तळवलकर, वि. स. वाळिंबे अशा अनेक मान्यवरांना निमंत्रित केलं होतं. प्रत्येकाची राहायची सोय केली होती. त्या दिवशी जणू छोटंसं साहित्य



संमेलनच भरल्यासारखं वाटत होतं. एका वेळी व्यासपीठावर इतके मोठमोठे साहित्यिक असणं व त्यांची भाषणं ऐकायला मिळणं, ही मोठीच पर्वणी होती. सभागृह त्या वेळेला तुडुंब भरलेलं होतं. प्रत्येक जण दादांविषयी फार छान बोलला. अनेक लोकांनी आवर्जून येऊन मला सांगितलं, की कार्यक्रम फार छान व अतिशय देखणा झाला. मला खूप समाधान वाटलं. कोल्हापुरातला तो एक फार सुंदर कार्यक्रम झाला. शरद तळवलकरांनी एक आठवण सांगितल्याचं मला स्मरतंय, की एकेकाळी त्यांची परिस्थिती खूप वाईट होती. त्यांना काही काम मिळत नव्हतं. तर दादांनी त्यांना सांगितलं, 'तू सगळं सोड आणि कोवाडला येऊन माझ्याकडं राहा. नंतर बघू काय होईल ते.' (सीडी ऐकणे) मला आठवतंय, की 'रंगल्या रात्री अशा' या सिनेमाची पटकथा दादांनी लिहून दिली होती. त्यात शरद तळवलकरांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. शूटिंगच्या वेळी बऱ्याचदा दादांना सेटवर बोलावलं जायचं. तेव्हापासून दादा व शरद तळवलकरांमध्ये दाट मैत्री झाली होती. दादांची मैत्री ही अशी गहरी, जिवाला जीव देणारी असायची.

खरं म्हणजे दादांच्या अशा कितीतरी आणखी सुंदर आठवणी लिहिता आल्या असत्या; पण त्या काळात मनात असं कधीही आलं नव्हतं, की मी असं काही लिहीन आणि आता स्मरणाच्या मर्यादा जाणवताहेत; पण तरीही माझ्यावर मुलाप्रमाणं प्रेम करणारे दादा, त्यांचे माझ्या आयुष्यातील स्थान फार मोलाचे व मानाचे आहे. माझ्याबद्दल त्यांना फार प्रेम होतं. त्यांचा सहवास हा मला नेहमीच श्रीमंत करणारा होता. त्यामुळं ज्यांच्यामुळं मी मोठा झालो त्यांच्या शक्य तितक्या आठवणी  पुस्तकरूपात वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा मी इथं प्रयत्न केला आहे. ते मी माझं कर्तव्य समजतो. ते माझे दुसरे वडीलच होते.

दादांच्या एकसष्टीनंतर दोन-तीन वर्षांतच दि. ६ मार्च, १९९२ या दिवशी वयाच्या ६४व्या वर्षी दादांचे मुंबईत निधन झाले. निधनापूर्वी पंधरा दिवस दादांना कोल्हापुरात डॉ. मेहतांनी तपासलं होतं. त्यांनी ॲडमिट व्हायला सांगितलं होतं; पण दादांनी ऐकलं नाही. ते मुंबईला गेले. तिथं मात्र जसलोक हॉस्पिटलला ॲडमिट व्हावंच लागलं. ६ मार्चला संध्याकाळी तीन ते चारच्या दरम्यान मला मुंबईहून दादा गेल्याचा फोन आला. ही बातमी कळली आणि मी पार कोलमडून गेलो. सकाळचे संपादक अनंत दीक्षित माझं सांत्वन करण्यास आले होते. त्यांच्या मिठीत मी अक्षरशः ढसढसा रडलो.

मला अश्रू आवरता आले नाहीत. रात्रीचा प्रवास करून मी सकाळी मुंबईत पोचलो. सुलोचनाबाई यांच्या घरी त्यांचं पार्थिव ठेवलेलं होतं. साहित्य क्षेत्रातले अनेक लोक त्यांचं अंत्यदर्शन घेण्यासाठी आले होते. तिथून दादांचं पार्थिव घेऊन आम्ही पुण्यात आलो. पुण्यात तासभर ऑफिसमध्ये अंत्यदर्शनासाठी त्यांचं पार्थिव ठेवलं. नंतर कोल्हापुरात आणलं. मग दुसऱ्या दिवशी त्यांचं पार्थिव घेऊन आम्ही कोवाडला गेलो. तिथं अंत्ययात्रेसाठी गावकऱ्यांची व दादांच्या चाहत्यांची मोठी गर्दी झाली होती. अतिशय शोकाकुल वातावरण होतं. मी स्वत:वर पूर्ण नियंत्रण ठेवून होतो. दुपारी तीन-साडेतीनच्या दरम्यान अंत्यसंस्काराचा विधी पार पडला.

मी जड अंत:करणानं दादांच्या वाड्यावर आलो. का कोणास ठाऊक मी अचानकपणे प्रचंड बेचैन झालो. माझं मलाही कळत नव्हतं. नंतर एकदम मी ठरवलं, की मी आता या क्षणी बांदोड्याला जायला हवं. आणि मी सर्वांना सांगितलं, की मी आता निघतोय. सर्वांना आश्चर्य वाटलं. रक्षाविसर्जन करूनच जा म्हणू लागले. मला थांबवलं नाही. मी तडक गोव्याला निघालो. माधवीताई बांदोड्याला राहत. मी त्यांच्या घरी गेलो. रात्री आठची वेळ. माधवीताई माझी वाट पाहत होत्या. मला दारात आलेला पाहताक्षणीच माधवीताई हुंदका देत म्हणाल्या, 'मला खात्री होती की कितीही उशीर झाला तरी तुम्ही मला भेटायला याल.' आणि त्या वेळी आम्ही दोघं ढसढसा रडलो.

दादा आता नाहीत हे पचवणं खूप जड होतं. सोपं नव्हतं. माधवीताई व दादांचा घटस्फोट झालेला असला तरी मला माहीत होतं, माधवीताईंसाठी हा अत्यंत दुःखद प्रसंग होता.

दादांनी मृत्यूपूर्वी मला एकच सांगितलं होतं, 'माझ्या पश्चात माधवीकडं पूर्णपणे लक्ष दे. जोपर्यंत तू आहेस तोपर्यंत मला काळजी नाही; कारण माधवीची तू काळजी घेशील. तिला सगळ्या प्रकारची मदत तू करशील; कारण माधवीवर माझं प्रेम आहे. आमचा जरी घटस्फोट झाला असला तरी...'

घटस्फोट झाल्यानंतर काही महिन्यांनी मला दादांनी एक पाकीट दिलं होतं. ते देताना त्यांनी सांगितलं होतं, की 'मी का घटस्फोट घेतो आहे याचं कारण यात आहे.' मी अजूनही ते पाकीट उघडून पाहिलं नाही.

मला नाही वाटत की मी ते उघडू शकेन. काहीही कारण असेल...

(क्रमश:)

## *'स्वामी'पल्याडचे रणजित देसाई...*

'स्वामी' म्हटलं की रणजित देसाई आणि रणजित देसाई म्हटलं की 'स्वामी'! समस्त मराठी वाचकवर्गाने जुळवलेलं हे एक मस्त समीकरण आहे; पण रणजित देसाई म्हणजे फक्त 'स्वामी'कारच का? वाचनवेड्या डोळ्यांसमोर आणखी काही नावं नक्की तरळतील. 'श्रीमान योगी', 'राधेय', 'राजा रवि वर्मा', 'पावनखिंड', 'बारी' एक ना अनेक. 'रूपमहाल' ते 'बाबुलमोरा' असे १६ कथासंग्रह, 'बारी' ते 'शेकरा' अशा १२ कादंबऱ्या, 'वारसा' ते 'पांगुळगाडा' अशी १२ नाटकं, १५ कविता, चार चित्रपटकथा आणि 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'राजा रविवर्मा', 'राधेय' या कादंबऱ्यांचे भारतीय भाषांमध्ये व इंग्रजीतही प्रसिद्ध झालेले अनुवाद. प्रत्येक कलाकृती दर्जेदार, प्रत्येक पुस्तक तितक्याच तोलामोलाचं, कल्पनेचा दैवी आविष्कार आणि तरीही वास्तवाची गहिरी किनार... हे ज्यांना जमलं, ज्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून हे सारं अवतरलं, आज इतक्या वर्षांनंतरही मराठी रसिकमनावर ज्यांचं अनभिषिक्त साम्राज्य पसरलं आहे ते रणजित देसाई म्हणजे खरोखरीच साहित्य विश्वातील स्वामी होते.

रणजित देसाई ऊर्फ दादा. साहित्याचा राजा. कोल्हापूर जिल्ह्यातील कोवाड नामक छोट्याशा खेडेगावातला त्यांचा जन्म. शिक्षण इंटरपर्यंत. लहानपणी त्यांना संगीताचा व्यासंग होता. आजीच्या आजारपणात वाचनाचे वेड लागले. एकदा त्यांनी आजीजवळ 'मला लेखक व्हायचंय,' असं सांगितलं तेव्हा आजी म्हणाली, 'मग हे सतार वाजवायचे, संगीत शिकायचे धंदे सोडून दे. आणि लेखकच व्हायचं असेल ना तर लक्षात ठेव. की तू लेखक हो, पण असा हो की आजवर असा लेखक लोकांनी कधी वाचला नसेल!' लेखक म्हणून यशस्वी होण्याची बीजे



बालवयातच पेरली गेली असल्याचे लक्षात घेण्यासारखे आहे.

पुढे शालेय शिक्षणासाठी त्यांनी कोल्हापूर गाठले. तिथे हायस्कूलमध्ये बापू जोशी नावाच्या शिक्षकांनी रणजित दादांची बुद्धिमत्ता आणि साहित्यिक अभिरुची लक्षात घेऊन त्यांच्याकडून हरिभाऊ आपट्यांपासून ते ना. सी. फडक्यांपर्यंत सर्व वाङ्मय वाचून घेतले. तिथूनच त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत गेली. 'महाद्वार' नियतकालिकात रवींद्रनाथांच्या 'गीतांजली'चा त्यांनी केलेला अनुवाद व्यं. ना. कुलकर्णी यांनी प्रसिद्ध केला नि रणजितदादांची लेखकपणाची नांदी झाली. पुढे एप्रिल १९४८मध्ये 'प्रसाद' मासिकात 'भैरव' ही कथा प्रकाशित झाली आणि तिला बक्षीसही मिळाले. पुढे फडके, खांडेकर यांचा सहवासही त्यांना लाभला आणि फडक्यांची अद्भुत शैली आणि खांडेकरांची ध्येयवादी दृष्टी यांच्या संगमातून त्यांची लेखनसृष्टी फुलली.

लेखन, नाटकात जरा जम बसला की एरवी, माणसं आपलं बिऱ्हाड उचलून पुण्या-मुंबईच्या वाटा पकडतात; पण दादांनी अखेरपर्यंत कोवाडमध्येच वास्तव्य केलं. तिथल्या मातीच्या सुगंधातूनच आपलं साहित्य फुलवलं. ग्रामीण जीवनाविषयी त्यांना कमालीची आस्था होती. ते अभिमानाने सांगत की, 'आधी मी शेतकरी आहे, नंतर लेखक!' विपुल प्रमाणात त्यांनी ग्रामीण, सामाजिक, संगीतप्रधान व निसर्गविषयक कथा लिहिल्या.

एक ज्येष्ठ, श्रेष्ठ आणि लोकप्रिय लेखक, कादंबरीकार, कथाकार, नाटककार म्हणून त्यांनी संस्मरणीय असा ठसा उमटविलेला हा लेखक खरंतर चौफेर कलावृत्तीचा अवलिया. संगीतावरप्रमाणेच चित्रकलेवरही त्यांची तितकीच नितांत श्रद्धा. छायाचित्रांचा भलताच शौक. जुन्या वस्तूंचाही संग्रह करण्याची भारी हौस ! सृजनशील निर्मितीचा ठेवा हा नवनिर्मितीची पालवी फोडणारा असतो, असं त्यावर स्पष्टीकरण.

'साहित्यगंध' हा कणाकणानं वेचावा लागतो. हा नुसता छंद नाही; कारण छंदबिंद कधीही बंद पडू शकतात; पण लेखन ही तपश्चर्या आहे. ती आयुष्यभर व्रतस्थपणे करावी लागते. रणजितदादा हे फक्त बोलत नसत, तर ही जीवनमूल्ये त्यांनी आयुष्यभर जपली.

रणजित देसाईंच्या साहित्यातून सतत हेच जाणवत राहते की त्यांच्या प्रज्ञेला विविध प्रकारची माणसं आणि त्यांच्या अंतर्मनाचा वेध घ्यायचा होता;

कारण ‘माणूस आणि जीवन’ हाच त्यांच्या चिंतनाचा विषय होता. माणूस, त्याचे वास्तव, मग ते ऐतिहासिक असो किंवा कलेच्या पातळीवर असो, ते त्या पातळीवरील वास्तवाला अधिकाधिक व्यापक आणि विशाल बनवत नेते आणि तेव्हाच साकारल्या जातात भव्य-दिव्य वाङ्मयकृती.

शहरात बसून ‘माझा गाव’ वाचणं वेगळं आणि हिरवंगार कोवाड हिंडताना तिची झिंग अनुभवणं वेगळं. आपली पहिली कादंबरी ‘बारी’ लिहिताना ते रोज बेरडवस्तीत हिंडायचे. एक वळण असं आलं की पुढे काही सुचेचना, तेव्हा सरळ त्यांनी आपलं बिऱ्हाड उचललं नि चक्क बेरड वस्तीत जाऊन दीड-दोन महिने मुक्काम ठोकला. ते तिथे राहिले आणि तिथेच त्यांनी ती कादंबरी पूर्ण केली. ‘बारी’, ‘माझा गाव’, ‘समिधा’, ‘प्रतीक्षा’ या त्यांच्या ग्रामीण साहित्यातून व्यक्ती आणि समाजजीवन यांचे वास्तव समोर येते. त्यांनी कायम माणसाचं माणूसपण हे ठळकपणे दाखवलं. त्यांच्या कथेतील पात्रं ही परिस्थितीशी संघर्ष करीत जातात आणि संघर्ष करताना येणाऱ्या मृत्यूचाही स्वीकार करताना दिसतात.

त्यांच्या पेहरावातूनही त्यांचे संगीतप्रेम उठून दिसे. टपोरे तीक्ष्ण डोळे, तलवारकट मिश्या, पान खाऊन रंगलेले ओठ, लेखकापेक्षा एखाद्या गवय्याला शोभेल असा पोशाख. खानदानी प्रवृत्तीचा दिलदार माणूस, वागण्या-बोलण्यात गोडवा. तो त्यांनी संतसाहित्याच्या अभ्यासातून मिळवला होता. त्यांची जातकुळी ‘ऐसी अक्षरे रसिके मेळवीन’ म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांची होती तर संस्कार ‘अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या’ ज्ञानदेवांचे होते.

अनेकांना हे ठाऊक नव्हते; परंतु रणजितदादा हे १४ गावांचे इनामदार होते. स्वतःच्या हिमतीवर बांधलेला प्रचंड मोठा वाडा, त्यावर शेकडो कामगारांचा प्रचंड राबता. वाड्यावर संगीत मैफली सजत. वसंतराव देशपांडे, ‘सी. रामचंद्र अशा दिग्गजांची हजेरी, तर कधी गानकोकिळा लता मंगेशकर तर कधी बालगंधर्व यांचे घरी येणे-जाणे असे, गानसरस्वती किशोरीताई आमोणकर, शान्ता शेळके, विजया राजाध्यक्ष , सुलोचनाबाई, डॉ. आनंद यादव, शंकर पाटील, कविश्रेष्ठ मंगेश पाडगावकर, मोहन वाघ, प्रभाकर पणशीकर या सगळ्यांशी त्यांचं प्रेमाचं, हक्काचं मैत्र जुळलेलं होतं. कोणीही असू दे, दादा तितक्याच मोकळेपणाने गुजगोष्टी करायचे. माणसांवर, माणुसकीवर, माणसांच्या विचारसरणीवर त्यांचं जिवापाड प्रेम होतं.

जे जे मानवी जीवनात सहजसुंदर व सुमधुर, त्या त्या गोष्टीचा त्यांनी आपल्या साहित्यात अंतर्भाव केला. ते नेहमी पराक्रम, शौर्य, धीर, त्याग यांचा महिमा वर्णन करत. त्यामुळे त्यांच्या साहित्याला वाङ्मयीन महत्ता प्राप्त होते. मानवी जीवनातील उदात्ततेचा शोध, हौतात्म्याची परंपरा, मैत्रिनिष्ठा, स्वामिनिष्ठा, वाचननिष्ठा या त्यांच्या साहित्यातील निष्ठावंत धारा होत. ते कायम उदात्तता, महत्ता, भव्यता, दिव्यता यांची श्रद्धेय मनाने पूजा बांधत. जीवनाचे स्वरूप कसे आहे व कसे असावयास हवे याचे चित्रण त्यांच्या साहित्यात आढळते. वास्तव जीवनाला आदर्श कसे बनवता येईल हाच त्यांच्या साहित्याचा मंत्र, तंत्र, प्रकृती, आकृती होत आणि म्हणूनच कदाचित पुस्तकओळख होण्याच्या वयातल्या लहानग्यापासून ते वार्धक्याच्या वाटा धुंडाळणाऱ्या रसिक वाचकालाही रणजित देसाईंची पुस्तके आपलीशी वाटून जातात. आपल्या साहित्यात त्यांनी क्षुद्रतेचा स्वीकार न करता जे जे भव्य-दिव्य आणि महनीय आहे त्याचाच कायम स्वीकार केला. त्यांनी कधी महायुद्धातील माणूस रेखाटला तर कधी महानायकातील माणूस साकारला. 'लार्जर दॅन लाइफ'ची भूक या मातीतील भारतीय संकृतीच्या मुशीतून घडवलेल्या कथांनी शमवली. साहित्यातील नीर-क्षीरन्याय करणारे ते राजहंस ठरले.

कोल्हापुरातील एका हॉटेलात स्वच्छतागृह साफ करणाऱ्या एका म्हाताऱ्याशी त्यांची गाठ पडली, तेव्हा त्या चाहत्याने त्यांना सांगितलं, की तुमची 'श्रीमान योगी' मी विकत घेऊन वाचली आहे; परंतु त्यात चुकीचा उल्लेख आहे, हे त्यांना अगदी निक्षून सांगितले. रणजितदादा अचंबित झाले.. तथ्य तपासण्यासाठी त्यांनी काही अभ्यासपत्रे पाहिली तर खरोखरच त्या म्हाताऱ्याचे म्हणणे बरोबर असल्याचे आढळले. दादांनी त्याला बोलावून घेऊन त्याचे आभार मानले. असं आभाळाएवढं मोठं मन लाभलेला हा लेखक पुढे 'पद्मश्री'स पात्र ठरला यात नवल ते काय!

वाचकांच्या प्रतिसादावर लेखकाचे भाग्य आणि भवितव्य अवलंबून असते याची त्यांना जाणीव होती. ते मोठ्या आपुलकीने आपल्या वाचकांची पत्रे जपून ठेवत. शक्य तितकी उत्तरे देत. ते अतिशय उदार आणि परोपकारी मनोवृत्तीचे असल्यामुळे पाहुणचार करण्यात त्यांचा हात कोणी धरू शकत नसे. मित्र, पाहुणा परत निघाला की आपसूक त्यांचे डोळे भरून येत. व्यावहारिक जगापेक्षा त्यांना भावनिक जगात वावरायला जास्त आवडे.

त्यांच्या स्वभावाला एक नाजूक, तरल, लोभस अशी विनोदाची किनार होती.

वाचकांना तर त्यांनी सांभाळलंच; पण प्रकाशक हाही त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा घटक होता. रा. ज. देशमुखांना त्यांनी पित्याप्रमाणे सांभाळलं तर अनिल मेहतांवर त्यांनी पुत्रवत् प्रेम केलं.

त्यांच्या ग्रामीण कथा, कादंबऱ्यामध्ये त्यांनी कोवाडच्या लोकजीवनाचा चातुर्याने उपयोग करून घेतला. विशेषतः, सण-उत्सव, भांडणे, राजकारण, भाऊबंदकी, ईर्ष्या इत्यादीचे चित्रण मोठ्या खुबीने केले आहे. आपलं गाव, वाडा, गावकरी, नोकरचाकर, आपली मित्रमंडळी, खास पाळलेले प्राणी-पक्षी या गोतावळ्याचा त्यांना अभिमान वाटत असे. कोवाडचे ऋणानुबंध त्यांनी अखेरपर्यंत जपले.

साहित्यनिर्मितीसाठी कधी स्वतःला कोंडून घेऊन आत्मकेंद्री राहिले नाहीत किंवा कोणालाही लहान-मोठे म्हणून कमीपणाने वागवले नाही. कधी श्रीमंतीचा तोरा नाही; पण मनाची गर्भश्रीमंती तसूभरही कमी पडली नाही.

दादांचा साहित्यठेवा नाशिकला हलवण्याची कुसुमाग्रजांची मनापासून इच्छा होती; पण याच मातीतून पुन्हा नवे साहित्यिक घडावेत यासाठी त्यांनी तो कोवाडमध्येच जपला. आज त्याच ठेव्याने जगाच्या नकाशावर या ठिपक्याएवढ्या गावाला वेगळी ओळख मिळवून दिली. सारस्वतांना कोवाडचं वेड लावलं.

रणजित देसाई यांच्यावर केवळ ऐतिहासिक लेखनाचा शिक्का मारून त्यांना केवळ 'स्वामी'तच शोधत बसलो, तर आपण कित्येक गोष्टींना मुकू. आयुष्यात अनेक संकटं येऊनही ज्यांची लेखनतपश्चर्या कधीच खंडित झाली नाही. 'नाच गं घुमा' सारख्या वादळांनीदेखील वाचकांची त्यांच्याप्रती निष्ठा कधी तसूभरही कमी झाली नाही. आज तीस वर्षे झाली दादांना जाऊन, तरी त्यांची लोकप्रियता ओसरली नाही, त्या रणजित देसाईंचा आदर्श प्रत्येक व्रतस्थ लेखकाला सृजनानंदाची दिशा देईल. प्रत्येक आस्वादक वाचकाशी उच्च भावनिक स्तरावर तरल संवाद साधेल, माणसाला माणूसपणानं जगायला शिकवेल. हे सगळं असं घडेल. फक्त गरज आहे ती 'स्वामी'पल्याड डोकावण्याची!

**– प्राजक्ता गव्हाणे**

**(मराठीमाती डॉट कॉम वरुन साभार)**

## *रणजित देसाई यांचे संगीतविषयक लेखन*

मराठी साहित्याच्या प्रांतात कथा या वाङ्मय प्रकारात नवकथा आणि ग्रामीण कथा या साधारण साठोत्तरी काळात उदयास आल्या आणि वाचकप्रिय झाल्या नवकथाकार म्हणून गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, विजया राज्याध्यक्ष इ. कथाकार सातत्याने कथालेखन करू लागले. याच सुमारास रणजित देसाई यांचेही कथालेखन जोमाने सुरू होते. त्यांनी त्यांच्या कथेतून विविध समकालीन विषयांना आणि माणसाच्या व्यथा-वेदना यांना स्थान दिले. त्याचप्रमाणे संगीतविषयक कथा, प्राणिकथा, निसर्गकथा हेही प्रकार त्यांनी हाताळले. त्यातही संगीतविषयक कथा हे त्यांच्या कथेतील एक वेगळे आणि त्यांच्या स्वतःच्या आवडीचे असे. कारण बालपण संस्थानकालीन वातावरणात गेले असल्याने संस्थानिक लोकांकडे होणाऱ्या संगीत मैफिली ऐकलेल्या आणि लहानपणी सतार शिकायची म्हणून आणि काही काळ चिखलीकर बुवा यांच्याकडे घेतलेली शास्त्रीय संगीताची तालीम ही त्या लिखाणामागची बलस्थाने.

‘बाबुलमोरा’, ‘कमोदिनी’, ‘गंधाली’, ‘प्रपात’, ‘मधुमती’ इ. कथासंग्रहात संगीतविषयक विपुल कथा आपल्याला वाचायला मिळतात. कलाकाराची कलेवर असणारी अपार निष्ठा, त्याची तत्वे, त्याचे भावविश्व इत्यादी टिपत पुढे सरकत जाणारी कथा वाचकाला त्या काळात घेऊन जाऊन वर्तमानातकाळ विसरायला भाग पाडते. ‘मधुमती’ कथेत असणारे गोव्यातील वर्णन असो अथवा ‘कौन भ्रम भुले’ या कथेतील तानसेन आणि बिलासखान यांच्यातील प्रेम आणि पराकोटीचा संघर्ष असो, ‘मघई’ कथेतील कोठीवरच्या बाईचे आणि आणि कथा नायकाचे स्वभावचित्रण किंवा ‘सेवा’ या कथेतील बदलत जाणाऱ्या काळातही देवीसमोर गायनसेवा रुजू करणाऱ्या नारायणरावांचे व्यक्तीचित्रण असो. वाचक लीलया त्या वातावरणात एकरूप होऊन त्यात मग्न होऊन स्वतःला काही काळ का होईना विसरून जातो. देसाई यांच्या कथेतील नायक असो वा नायिका ही दुःखी, एकाकी






आणि कुठल्यातरी शोकात बुडालेली किंवा परिस्थिती समोर गांजलेली मात्र तरीही आपल्या कलेत स्वतःला गुंतवून घेऊन आपल्या दुःखाला विसरू पाहणारी अशी व्यक्तिचित्रणे आपल्याला पाहायला मिळतात.

कथाच नव्हे तर नाटक आणि कादंबरी या साहित्यप्रकारात ही देसाईंनी संगीतविषयाला प्राधान्य दिलेले आपल्याला पाहायला मिळते. 'अभोगी' सारखी कादंबरी फडके तंत्राने म्हणजेच फ्लॅशबॅक पद्धतीने लिहिली गेलेली; मात्र त्यातही कादंबरी नायक आणि त्याची संगीत कलेवरची निष्ठा, प्रेम यालाच झुकते माप दिले गेलेले पाहायला मिळते. 'हे बंध रेशमाचे' या नाटकाच्या माध्यमातून संगीत नाटक हा मराठी रंगभूमीचा एकेकाळी सुवर्णकाळ पाहिलेला प्रकार ही त्यांनी हाताळला आणि शांताबाई शेळके यांची गीते, जितेंद्र अभिषेकी यांचे संगीत, डॉ. वसंतराव देशपांडे, बकुळ पंडित यांच्या सारख्या गायक मंडळींचे योगदान यामुळे मराठी रंगभूमीवर आगळावेगळा ठसा उमटवणारे नाटक. 'संगीत तानसेन' हे नाटक खरं तर 'बाबूलमोरा' कथासंग्रहातील 'कौन भ्रम भुले' या कथेचे नाट्यरूपांतर मात्र तेही देसाई यांनी आपल्या खास अशा शैलीने वाचकांच्या समोर मांडले आहे.

'रंगल्या रात्री अशा' हा मराठी चित्रपट म्हणजेच रसूल या कथेवर बेतला गेलेला चित्रपट. याचेही पटकथा आणि संवाद लेखन देसाई यांचेच. यात नाटक कंपनी त्यातील चालणारे हेवेदावे आणि कलाकारांतील बेबनाव त्यातून उत्पन्न होणारे कलह, ईर्ष्या आणि त्यावर मात करत केली जाणारी कलेची उपासना. एक वेगळा आविष्कार म्हणून या चित्रपटाचे नाव घ्यावे लागेल.

समकालीन लेखक मंडळीत वावरून ही नवकथाकार किंवा ग्रामीण कथा लिहून ही ग्रामीण कथाकार हा शिक्का न पडू देता सातत्याने नवनिर्मिती करणारा लेखक म्हणजेच रणजित देसाई. 'स्वामी'च्या यशाने अनेक मानमरातब प्राप्त होऊन 'स्वामीकार' या किताबाने आजही ओळखला जाणारा मराठीतील एक उमदा लेखक. बाकी सगळं जरी असलं तरीही आपल्या संगीत विषयक कथांतून कलाकारांच्या मनातील कलेवरील निष्ठा, प्रेम, त्यांच्यातील भावभावना, असूया, मत्सर, ईर्ष्या, संघर्ष याचे चपखल चित्रण करून एका वेगळ्याच भावविश्वात घेऊन जाऊन मनसोक्त वाचनानंद देणाऱ्या या लेखकास आदरांजली!!

**– प्रतिक येतवडेकर**

## *थोरामोठ्यांच्या नजरेतून 'रणजित देसाई'...*

**विजया राजाध्यक्ष** : साहित्यविश्वात ऐतिहासिक कादंबरीला रणजित देसाई तथा दादांनीच नवे आयाम दिले. आज ऐतिहासिक कादंबरी लेखनाचा जो काही प्रवाह वाहत आहे त्याचा मूळ स्रोत दादांच्या ऐतिहासिक साहित्यकृतींच्या पानोपानी आहे.

दादांशी पहिली ओळख झाली ती कोल्हापुरातच. त्यामुळे कोल्हापुरात येताना माहेरी आल्याचा आनंद मिळतो. माझं दादांशी रक्ताचं नात नसेलही; पण आमच्यातील स्नेहाचे पदर मात्र विलक्षण दृढ आहेत. साहित्याच्या कितीही उंचीवर पोहोचलेली व्यक्ती पाहिली की वाटतं आपली मुळं इथंच... कोल्हापुरातच आहेत. दादांकडे मी नेहमीच आदर्श म्हणून पाहत आले आहे. दादांचा निखळ साहित्याविष्कार घडताना मी पाहिला आहे. यापूर्वी तब्येतीच्या तक्रारीमुळे त्यांचे लिखाणही थंडावले; पण त्यांनी दर्जेदार साहित्याची जी काही शिदोरी मागे ठेवली आहे ती आज कालबाह्य झाल्यासारखी वाटेल; परंतु दादांच्या साहित्याच्या मुळाशी गेल्यास दादांच्या लेखनातील समकालीन संदर्भ आजही तितकेच पूरक असल्याचे प्रकर्षाने जाणवते. इंग्रजी साहित्याचं प्रचंड वाचन आणि अगणित संदर्भांचा खजिना, आणि ते मांडण्याची उपजत प्रतिभा हीच दादांची समृद्धी होती. नवोदितांना प्रेरणा देण्याची दानत जी कोल्हापूरच्या रक्तातच असावी म्हणूनच दादांचा नवोदितांना नेहमीच आधार वाटायचा. आज कोल्हापूरला येताना जी आत्मीयता वाटते, जी आपुलकी वाटते, ती दादांसारख्या मोजक्या लोकांच्या ओढीतूनच निर्माण होते.'

**सुलोचना लाटकर** : 'रंगल्या रात्री अशा'च्या निमित्ताने भालजींबरोबर 'प्रभात'मध्ये दादांशी ओळख झाली. त्याचे बंध कधी मैत्रीच्या नात्यात गुंफले गेले हे समजले नाही. कधी एखाद्या लहान मुलासारखा हट्ट करणारे दादा कधी समजूतदारपणाचा कळस गाठत. दादांशी एकदा का मनाचे सूर जुळले की त्या ठिकाणी निर्व्याज नातंच आकाराला येतं, याचा अनुभव मला मिळाला म्हणूनच कोवाडचं घर मला माहेरपणाची सावली देतं.

**कांचन घाणेकर** : दादांचे लेखन वाचताना कुठेतरी आपल्यातील लेखनाच्या कौशल्यालाही प्रोत्साहन मिळत असल्यासारखं वाटतं.

**स्मिता तळवलकर** : एका पिढीचा वारसा जेव्हा दुसरी पिढी समर्थपणे संभाळते, असा योगायोग खूप कमी वेळा आढळतो. पारूताईच्या

‘मोहिनी’च्या पानोपानी दादांचं लेखनसामर्थ्य पेलणारं कुणीतरी आहे याचा आनंद जास्त होतो. दिग्दर्शिकेच्या नजरेतून पाहताना दादांची ‘मधुमती’, ‘अबोली’ या साहित्यकृतीतील प्रत्येक वर्णन कलाकृती बनवण्याची प्रेरणा देते. दोन ओळींमधला अर्थ शोधण्याची जी ऊर्मी असते ती दादांच्या लेखनात होती. म्हणूनच दादांची कादंबरी आजही पुन:पुन्हा वाचाविशी वाटते.

**पारू नाईक** : दादा माझे फक्त वडीलच नव्हते तर ते माझे मित्र होते. सवंगडी होते. आदर्श होते. मार्गदर्शक होते. माझी आईही तेच होते. सुट्टीत ते स्वतःभोवतीचं प्रसिद्धीचं वलय बाजूला ठेवून फक्त आम्हा बहिणींचे असायचे. त्यांच्या नसण्याची जाणीव कशानेही भरून निघणार नाही.

**मधुमती शिंदे** : दादा आध्यात्मिक मनोवृत्तीचे होते. परमेश्वरावर त्यांची नितांत श्रद्धा होती. आमच्या वाड्यात श्रीकृष्णाचं सुंदर मंदिर आहे. तिन्हीसांजेला दादा, काका व गावातील ठरावीक लोक भजन-कीर्तन करत. दादांचा गळा उत्तम म्हणून ते सुंदर भावगीतं, भजनं म्हणत व शेतकऱ्यांना मंत्रमुग्ध करत. आमच्या वाड्यात अनेक जातिधर्माची गडीमाणसे समान भावनेने राहत. आम्ही सर्वजण त्यांच्या मुलांबरोबर एकत्र स्वयंपाकघरात बसून जेवत असू व खेळत असू. दादा त्यांच्या मुलांचं शिक्षण, कपडालत्ता पण पाहत. दादांनी कधीच गर्व, द्वेष, मत्सर, हेवेदावे केले नाहीत. दादांना कुणीही हिणवून बोललं तर ते म्हणायचे, ‘निंदक शेजारी असावा. चिखलात दगड टाकला तर चिखल आपल्याच अंगावर उडतो.’ ते कधीही प्रत्युत्तर देत नसत.’



### *अक्षरलेणे...*

साठोत्तरी कालखंडातील 'स्वामी' ही कादंबरी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. ही कादंबरी म्हणजे एक स्वतंत्र प्रवाह आहे. या कादंबरीनंतर रणजित देसाई यांना 'स्वामी'कार अशी उपाधी मिळाली हे देखील महत्त्वाचे स्थित्यंतर आहे. मराठी साहित्यामध्ये अक्षरलेणे असा गौरव करता येईल,

मराठी साहित्यामध्ये साठोत्तरी कालखंड हा महत्त्वाचा मानतात. भारताच्या स्वातंत्र्यानंतरचे दशक उलटून गेले होते. या काळामध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आली. या स्थित्यंतराचे प्रतिबिंब साहित्यामध्येदेखील उमटले. ही स्थित्यंतरे मराठी साहित्यातील निर्णायक निकष ठरली आहेत. मर्ढेकरी कालखंड आणि मर्ढेकरयुगाच्या प्रभावाने नवसाहित्याचे विविध प्रकार उदयास आले. कथा, कादंबऱ्या, कविता आणि नाटके या वाङ्मय प्रकाराचा यामध्ये समावेश होतो. मराठी साहित्यामध्ये अक्षरलेणे असा गौरव करता येईल अशी 'स्वामी' ही कादंबरी अजूनही तितकीच लोकप्रिय आहे. या कादंबरीतील कथानकाशी वाचक स्वत:ला 'रिलेट' करू शकतो, हे या कादंबरीचे बलस्थान आहे, असे म्हणता येते.

साने गुरुजींच्या 'आस्तिक' या कादंबरीनंतर साठोत्तरी कालखंडामध्ये रणजित देसाई हे कादंबरीकार उदयास आले. १९६२मध्ये 'स्वामी' प्रकाशित झाली, तेव्हा रणजित देसाई हे ३४ वर्षांचे होते. हा काळ असा होता की स्वातंत्र्यानंतरचे दशक संपले होते. नेहरू युगाच्या मावळतीला सुरुवात झाली होती. स्वातंत्र्याचे रूपांतर सुराज्यामध्ये होईल या अपेक्षा काही अंशी फोल ठरू लागल्या होत्या. त्यामुळे सर्वच प्रस्थापितांच्या विरोधात वातावरण होण्याची सुरुवात होऊ लागली होती. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचे बंड आणि विद्रोहाची भावना वाढीस लागत होती. याच कालखंडामध्ये मराठी लघु नियतकालिकांची परंपरा सुरू झाली, ती या व्यवस्थेविरुद्धच्या विद्रोहाला वाचा फोडण्याचे साहित्य प्रकाशित करण्यासाठीच. अशा वातावरणात आलेल्या 'स्वामी'ला वाचकांनी आपलेसे केले ही गोष्ट नाकारता येणार नाही. वाचकांनी या कलाकृतीचे स्वागतच केले. एवढेच नव्हे, तर तिला डोक्यावर घेतले, ही वस्तुस्थिती आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील रणजित देसाई हे एका अर्थाने हाडाचे रोमँटिक. रोमँटिक हा शब्द येथे शास्त्रीय अर्थाने वापरला आहे, हे ध्यानात घेतले

पाहिजे. देसाई यांच्यामध्ये आधुनिकतेबरोबरच सरंजामशाहीचाही प्रवाह होता. सरंजामशाहीमध्ये राजा, प्रधान आणि जनता अशी व्यवस्था असते. एका अर्थाने राजाविषयीची निष्ठा महत्त्वाची मानली जाते. रणजित देसाई यांचे व्यक्तिमत्त्व हे तशा प्रकारच्या सरंजामशाहीचे (फ्यूडॅलिझम) आहे. गोष्टीरूप आणि प्रेम यांच्या आधारे भावोत्कटतेचा प्रभाव त्यांच्यावर आहे. तसे व्यक्तिमूल्य आणि स्वातंत्र्य या आधुनिकतेच्या मूल्यांचे आकर्षण कमी असल्याचे जाणवते. माधवराव पेशवे आणि रमा या आदर्श पती-पत्नीचे संबंध हे 'स्वामी' या कादंबरीचे कथासूत्र आहे. अशाच प्रकारचे कथासूत्र त्यांच्या 'श्रीमान योगी' या पुढील कादंबरीमध्ये देखील ठळकपणाने जाणवते. समर्थ रामदास स्वामी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील संबंध त्यांनी 'श्रीमान योगी' कादंबरीमध्ये रेखाटले आहेत. 'स्वामी' हे कादंबरीचे शीर्षक हेच निष्ठेचा अर्थ सूचित करणारे आहे. ही निष्ठा इतिहासावर आहे. 'श्रीमान योगी' कादंबरीमध्ये समर्थ रामदास हेच 'स्वामी' आहेत. सरंजामशाही ही केवळ बाह्य अवस्था नाही, तर ती जीवनमूल्ये आहेत हे रणजित देसाई यांच्या 'स्वामी' आणि 'श्रीमान योगी' या दोन्ही कादंबऱ्यांमधून स्पष्टपणाने अधोरेखित होते.

'स्वामी'च्या माध्यमातून मूर्तिपूजेला, व्यक्तिपूजेला आणि परंपरेला मानणारा प्रवाह वाचकांसमोर आला. इतिहास आणि परंपरा पूजन हा एक 'ट्रेन्ड' आपल्या समाजात आहे. त्याचे प्रतिनिधित्व 'स्वामी' करते. माधवराव पेशवे हे त्या कालखंडातील पराक्रमी पेशवे; पण अल्पायुषी असल्यामुळे महापराक्रमी असूनही हे पेशवे एका अर्थाने दुर्दैवी ठरले. 'स्वामी' या शब्दातील निष्ठा हे सरंजामशाहीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. मराठी साहित्यामध्ये सतीचे इतके अप्रतिम वर्णन हे रणजित देसाई यांच्या प्रतिभेचेच द्योतक आहे. एका बाजूला राजकीय कर्तृत्व, तर दुसऱ्या बाजूला शोकात्म प्रेमकथा हेच 'स्वामी' कादंबरीचे सूत्र आहे. कादंबरीतील प्रसंग इतिहासातील असले तरी त्याला परंपरागत मूल्यांची बैठक होती. ही शैली रणजित देसाई यांच्याकडे होतीच. भावोत्कट व्यक्तिचित्रण, कलात्मक आकृतिबंध, नाट्य आणि इतिहासाचे पारंपरिक भान ही 'स्वामी' या कादंबरीची वैशिष्ट्ये आहेत. इतिहासातील कण वेचून त्याचे हिमशिखर करण्याची क्षमता रणजित देसाई यांच्या प्रतिभेमध्ये आहे. लोकप्रिय साहित्य ही समाजाची गरज असते.



‘पॉप्युलर’ लेखकांमध्ये लोकाभिरुचीचा अनुनय करण्याचा कल स्पष्टपणे जाणवतो. साने गुरुजींची ‘आस्तिक’, वि. स. खांडेकर यांची ‘ययाति’, रणजित देसाई यांची ‘स्वामी’ आणि शिवाजी सावंत यांची ‘मृत्युंजय’ या कादंबऱ्या एका अर्थाने ऐतिहासिक घटनांचा कालानुरूप अन्वयार्थ लावलेल्या ‘क्लासिक’ कलाकृती आहेत.

ज्या कारणांसाठी मला ‘स्वामी’ ही कलाकृती आवडली त्याच कारणांसाठी ती कलाकृती दुसऱ्या व्यक्तीला आवडेलच असे नाही. तसा कोणत्याही लेखकाचा आग्रहदेखील नसतो. वाचकाला आवडणारी कलाकृती हेच चांगल्या साहित्यकृतीचे एकमेव लक्षण नाही. जी कलाकृती नवनवोन्मेषशाली असते, ती आशयघनही असते. ‘स्वामी’ने वाचकवर्गाचा अनुभवाचा परीघ विस्तारला हे नाकारता येणार नाही. ज्याप्रमाणे राजसत्ता, ज्ञानसत्ता, धनसत्ता आणि सांस्कृतिक सत्ता आहे त्याचप्रमाणे साहित्य ही देखील एक सत्ता आहे. साहित्यलेखन करणाऱ्याला समाजामध्ये मान मिळतो. ‘स्वामी’कार रणजित देसाई यांनी तो मान आपल्या अमूल्य लेखणीतून सन्मानाने मिळवलेला आहे.

**– प्रा. रा. ग. जाधव**

## *स्वामी - एक आकलन*

माधवराव पेशवे यांच्या जीवनावरील चरित्रात्मक, ऐतिहासिक कादंबरी लिहिणारे रणजित देसाई हे मराठीतील प्रथितयश, लोकप्रिय साहित्यिक म्हणून ओळखले जातात. देसाई यांनी कथा, कादंबरी, नाटक, लेखसंग्रह अशी वैशिष्ट्यपूर्ण साहित्यनिर्मिती करून मराठी वाङ्मय क्षेत्रात मोलाची भर घातली आहे. वैविध्यपूर्ण साहित्याची निर्मिती करणाऱ्या देसाई यांना 'स्वामी' या कादंबरीने मराठी साहित्याच्या आवर्तनात त्यांची एक वेगळी ओळख करून दिली आहे. एखादी कलाकृती त्या लेखकाला कशी मोठी करते हे सांगताना डॉ. प्रल्हाद वडेर म्हणतात, 'एखाद्या लेखकाचे नाव त्याच्या एखाद्या वाङ्मय कृतीशी इतके निगडित होऊन जाते  की त्याच्या इतर वाङ्मय  प्रकाराकडे रसिक वाचकांचे दुर्लक्ष होते. इंग्रजीमध्ये जेन ऑस्टेन लेखिकेचे नाव तिच्या 'प्राइड ॲन्ड प्रेज्युडीस' या कादंबरीशी असेच निगडित झालेले आहे. मराठीतही रणजित देसाई यांचे नाव 'स्वामी'कार म्हणूनच ओळखले जाते.

एक वाचकप्रिय ऐतिहासिक कादंबरी म्हणून 'स्वामी'ने लोकप्रियतेचे शिखर गाठले आहे.  ऐतिहासिक जीवनवास्तवाला प्रभावीपणे साकारणाऱ्या 'स्वामी'ने ऐतिहासिक कादंबरीच्या परंपरेत स्वतंत्र युग निर्माण केले. ऐतिहासिक कादंबरीमध्ये ती एक सन्मानबिंदू ठरली.

ऐतिहासिक कादंबरीत मैलाचा दगड ठरलेल्या या कादंबरीच्या लोकप्रियतेविषयी सांगताना डॉ. मीरा घाडगे म्हणतात, 'कादंबरीची लोकप्रियता तिच्या शीर्षकातच आहे. हे शीर्षक सुरुवातीपासून शेवटपर्यंत एक वलय निर्माण करते. त्याप्रमाणे कादंबरीच्या शीर्षकापासून कादंबरीच्या लोकप्रियतेचा घाट तयार झाल्याचे मान्य करता येते.

'स्वामी' ही ऐतिहासिक कादंबरी असली तरी कथानकात व्यक्तित्वाला प्राधान्य देणाऱ्या घटना-प्रसंगांची रेलचेल असल्याचे दिसून येते. म्हणजे 'स्वामी' व्यक्तिक्रेंद्रितेला प्राधान्य देणारी आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. 'स्वामी'च्या व्यक्तिकेंद्रितेविषयी सांगताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''स्वामी' ऐतिहासिक कादंबरी असली तरी कादंबरीतून साकारणारे ऐतिहासिक वातावरण कादंबरीतील व्यक्तित्वाला ऐतिहासिक बनवून सामोरे आणते.'

ही कादंबरी मोठ्या साक्षेपाने लिहिली आहे. ही कादंबरी लिहिण्याकरिता त्यांनी ऐतिहासिक ग्रंथ, ऐतिहासिक पत्रव्यवहार व बखरी यांचा खूपच अभ्यास केला असल्याचे कादंबरीच्या कथानकातून दिसून येते.

**– प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण**

## पद्मश्री रणजित देसाई यांची साहित्यसंपदा

| | |
|---|---|
| **कादंबरी** | **किंमत** |
| स्वामी | २९० |
| (राज्य पुरस्कार १९६२, ह.ना. आपटे पुरस्कार १९६३, साहित्य अकादमी पुरस्कार १९६४) | |
| श्रीमान योगी | ५७५ |
| अभोगी | २२० |
| राधेय | २३० |
| पावनखिंड | १७० |
| माझा गाव | २९५ |
| समिधा | १५० |
| बारी | २०० |
| राजा रविवर्मा | ३४० |
| प्रतिक्षा | १४० |
| शेकरा | ९५ |
| लक्ष्यवेध | १५० |
| **कथासंग्रह** | **किंमत** |
| संकेत | १२० |
| कातळ | १२० |
| रुपमहाल | १२० |
| मोरपंखी सावल्या | १२५ |
| आषाढ | १३० |
| मधुमती | १४० |
| वैशाख | १४० |
| मेघ | १६० |
| मेख मोगरी | १६० |
| प्रपात | १७० |
| कमोदिनी | १७० |
| गंधाली | १८० |
| बाबुलमोरा | १८० |
| आलेख | १९५ |
| **नाटक / एकांकिका** | **किंमत** |
| संगीत तानसेन | ७० |
| सावली उन्हाची | ७० |
| हे बंध रेशमाचे | ८० |
| पंख जाहले वैरी | ९० |
| धन अपुरे | ९० |
| कांचनमृग | १०० |
| रामशास्त्री | १०० |
| वारसा | ११० |
| श्रीमानयोगी | १२० |
| लोकनायक | १२० |
| तुझी वाट वेगळी | १२० |
| स्वामी | १२० |
| पांगुळगाडा | १२० |
| गरुडझेप (रणजित देसाई आणि वसंत कानेटकर) | १२० |
| **ललित** | **किंमत** |
| स्नेहधारा | १६० |
| संचित (निवडक अध्यक्षीय भाषणे) | १२० |

## ‘श्रीमान योगी’ डोक्यावर ठेवून काढली मिरवणूक आणि ‘स्वामी’काराला दिलं सोन्याचं कडं बक्षीस

महाराष्ट्राचं राजकारण जरी इरसाल म्हणून ओळखलं जात असलं तरी इथले पुढारी साहित्य-कला-संस्कृतीचे रसिक मानले जातात. अगदी पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांच्या पासून ते विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे यांच्यापर्यंत ही परंपरा चालत आलेली आहे. याच परंपरेचा भाग होते कराडचे बाळासाहेब देसाई.

बाळासाहेब देसाई म्हणजे स्वातंत्र्यलढ्याच्या काळापासून काँग्रेसमध्ये सक्रिय असणारे नेते. यशवंतराव पहिल्यांदा द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांच्या मंत्रिमंडळात बाळासाहेब देसाई सार्वजनिक बांधकाम मंत्री बनले होते, महाराष्ट्राचे पहिले शिक्षण मंत्री म्हणून त्यांना ओळखलं गेलं. आपल्या मंत्रिपदाच्या कारकिर्दीत थेट मोरारजी देसाई यांच्यासारख्या तगड्या नेत्याशी भांडून महाराष्ट्राला न्याय मिळवून देणारा नेता म्हणून बाळासाहेबांना ओळखलं जायचं.

वसंतराव नाईक यांच्या ऐवजी त्यांचीच मुख्यमंत्रीपदी निवड होईल अशी चर्चा होती; पण विदर्भ, मराठवाड्याला न्याय मिळावा म्हणून यशवंतराव चव्हाणांनी त्यांच्याकडे शब्द टाकला व बाळासाहेब देसाईंनी पडती बाजू घेत ग्रहमंत्रीपद स्वीकारलं.

बाळासाहेबांना राज्यभरात काँग्रेसची मुलुखमैदान तोफ म्हणून ओळखलं जायचं. पश्चिम महाराष्ट्राचं नेतृत्व करणाऱ्या या रांगड्या राजकारण्याच्या मनात मात्र साहित्यिकांबद्दल आस्था व हळवी बाजू होती. आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर अशा अनेक दिग्गज लेखकांशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते; मात्र त्यांचे जवळचे सहकारी म्हणून ओळखले जायचे ते ‘स्वामी’कार रणजित देसाई.

कोवाडचे इनामदार असलेल्या, घरात संपन्नता नांदत असणाऱ्या रणजित देसाईंना मराठेशाहीच्या इतिहासाने भुरळ घातली. त्यांनी श्रीमंत माधवराव पेशवे यांच्यावर लिहिलेली ‘स्वामी’ ही कादंबरी मराठी साहित्यात मानदंड म्हणून ओळखली गेली. ‘स्वामी’नंतर रणजित देसाई कर्णावर ‘राधेय’ ही कादंबरी लिहीत होते.

एक दिवस त्यांची लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्याशी भेट झाली.

बाळासाहेब त्यांना म्हणाले,

''रणजित, सध्या काय लिहिताय? छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचं लेखन आपण करावं ही आमची इच्छा आहे.''

शिवरायांचे चरित्र लिहिणे ही खरंतर प्रचंड मोठी जबाबदारी होती. ती आपल्याला पेलवेल का हीच रणजित देसाईंना शंका होती. त्यामुळे या आधी मनात विचार येऊनही त्यांनी शिवचरित्र लिहिण्याचं धाडस केलं नव्हतं. कादंबरी लिहिताना आपल्या हातून एखादी आगळीक घडेल का याची त्यांना चिंता वाटत होती. तरी ते गमतीने बाळासाहेबांना म्हणाले,

''मी कादंबरी लिहिली तर तुम्ही मला काय देणार?''

तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता बाळासाहेब देसाई त्यांना म्हणाले,

''रणजित, तुमची कादंबरी लिहून झाली की तिचे हस्तलिखित डोक्यावरून वाजतगाजत मुंबईच्या शिवाजी पार्कवर नेईन आणि तुमच्या हातात सोन्याचं कडं घालीन.''

रणजित देसाई यांना जाणवलं की, आपल्या शिरावर कोणती महत्त्वाची जबाबदारी येऊन पडली आहे. अखेर त्यांनी मनाची तयारी करून शिवचरित्रावरील कादंबरी लिहायला घेतली. तब्बल चार वर्षे संपूर्ण महाराष्ट्रात फिरून, अनेक इतिहासकारांच्या भेटी घेतल्या आणि संदर्भ गोळा केले. शिवकालीन कागदपत्रे तपासली. दरम्यानच्या काळात बाळासाहेब देसाई यांचा पाठपुरावा सुरूच होता.



अखेर चार वर्षांच्या मेहनतीने रणजित देसाई यांनी ही ऐतिहासिक कादंबरी पूर्ण केली. त्याला नाव दिलं, 'श्रीमान योगी.'


छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर लिहिलेली ही त्या काळातील पहिलीच कादंबरी असावी. सुप्रसिद्ध लेखक नरहर कुरुंदकर यांची प्रस्तावना असलेल्या या पुस्तकाच्या सुरुवातील गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या आग्रहामुळे हे साहित्यशिल्प साकार झाले याचा स्पष्ट उल्लेख केला.

जेव्हा या कादंबरीचं हस्तलिखित दाखवण्यासाठी रणजित देसाई बाळासाहेबांच्या घरी गेले तेव्हा हर्षातिरेकाने बाळासाहेब देसाईंनी त्यांना मिठी मारली. आणि म्हणाले,

''रणजित, आज तू माझ्या घरी आलास, तुझ्या स्वागताला मी आलो; पण मी जर आज राज्याचा मुख्यमंत्री असतो तर हत्तीवरून वाजतगाजत मिरवणूक काढली असती.''

बाळासाहेबांना आपले शब्द लक्षात होते. त्यांनी खरोखरच रणजित देसाई यांची मुंबईत मिरवणूक काढली. आपल्या डोक्यावर 'श्रीमान योगी'चं हस्तलिखित ठेवून ते शिवाजी पार्क येथे पोहोचले. अनेक साहित्यिक, इतिहास संशोधक हजर असलेल्या या समारंभात 'श्रीमान योगी'चे प्रकाशन करण्यात आले. रणजित देसाई यांच्या हातात गृहमंत्र्यांनी स्वतःच्या हाताने सोन्याचे कडे चढवले व त्यांचा सन्मान करण्यात आला. छत्रपतींचे चरित्र लिहिल्याबद्दल शिवभक्त रसिकांची ही बिदागी होती.

**– 'बोल भिडू'वरून साभार**









श्रद्धांजली

# बोले तैसा चाले
# काळाबरोबर चालणारे प्रकाशक

सुनील मेहता यांनी १९८६साली मेहता पब्लिशिंग हाऊसची सूत्रे हातात घेतली. त्याच साली मी ढवळे ग्रंथ यात्रेत रुजू झालो. पुढे काही वर्षांनी ढवळे ग्रंथ यात्रेचे प्रदर्शन दादरला धुरू हॉल येथे सुरू होते, त्या वेळी सुनील मेहता प्रदर्शनात आले होते. रघुवीर ढवळे यांनी माझी ओळख करून दिली आणि पुढे आमचे सातत्याने भेटणे-बोलणे होत राहिले. पुढे काही वर्षांनी ढवळे ग्रंथ यात्रा बंद झाली तेव्हा ते व त्यांचे वडील अनिल मेहता यांनी माझ्याशी संपर्क साधला. त्या दोघांचे म्हणणे होते की, ‘तू जर नोकरी करणारच असशील तर ती मेहता पब्लिशिंग हाऊसमध्ये करावी.’ पण, मी त्या मन:स्थितीत नव्हतो. मी डोक्यात फक्त एकच विचार केला होता की, काही दिवस पुस्तक, वाचक, लेखक, प्रकाशक या सर्वांपासून दूर राहायचे आणि कोकणात जाऊन शांतपणे पुढील प्लॅनिंग करायचे. त्यामुळे माझ्या नोकरीचा तो विषय थांबला आणि मी व शैलेशने प्रदर्शन करण्याचे नक्की केले. त्या वेळी माझ्या या विचाराचे सुनील मेहता यांनी स्वागतच केले. तुमचा अनुभव लक्षात घेता तुम्ही नक्कीच प्रदर्शन चांगले करू शकता, फक्त ढवळे ग्रंथ यात्रेच्या चुका तुम्हाला दुरुस्त करता आल्या पाहिजेत. मुख्य म्हणजे प्रकाशकांचे विक्री झालेल्या पुस्तकांचे पैसे वेळेवर द्या, तुम्हाला प्रकाशक नक्की मदत करतील, असे त्यांचे म्हणणे होते आणि आम्ही त्याप्रमाणे करत गेलो. सुरुवातीच्या काळात आमची उमेद

वाढविण्यासाठी त्यांचे विचार मोलाचे होते. पुढे प्रदर्शनागणिक आम्ही काही प्रयोग केले. कधी कधी आपणहून त्यांनी लेखकांना प्रदर्शनात सहभागी केले. प्रत्येक प्रदर्शनात लागणारी हॅन्डबिलं अनेक वर्षं आम्ही सांगू तेवढी ते छापून देत असत. नाशिकच्या एका प्रदर्शनात त्यांनी विशिष्ट पुस्तक खरेदीवर एक ग्रॅम सोने भेट देऊ, अशी योजना सुचवली आणि आम्ही ती राबवली. एकूण योजनेला, प्रदर्शनाला मोठा प्रतिसाद मिळाला. या योजनेचे प्रायोजक मेहता पब्लिशिंग हाऊस हे होते.

पुढे अक्षरधारा बुक गॅलरी सुरू केली तेव्हा दिवाळीच्या प्रदर्शनामध्ये एक चर्चासत्र आयोजित केले होते, त्यामध्ये त्यांनी 'अक्षरधारा' काळाबरोबर राहिली तर टिकेल असे वक्तव्य केले. त्यांनी उदाहरण म्हणून सांगितले, की रमेशने मला ऑर्डर फोनवर/लेखी न देता मेलवर द्यायला हवी. पुढे जाऊन नव्या तंत्रज्ञानाचा वापर वाचकांना देणाऱ्या सोयीसुविधा देणे त्याने स्वीकारले पाहिजे. १२ वर्षांपूर्वी त्यांनी मला एक नवी दिशा दिली, त्याचा मी आज आनंद घेत आहे. व्यवसायात उपयोग करत आहे. आज 'अक्षरधारा' देशात-परदेशात ऑनलाइन पुस्तके देत आहे.

आम्ही मेहता पब्लिशिंग हाऊसची पुस्तके साधारण १२ ते १५ पिशव्या प्रदर्शनासाठी नेत होतो. तीन महिन्यांनंतर आम्ही जेव्हा शिल्लक पुस्तके परत करत होतो तेव्हा परत आलेल्या पिशव्या मोजून ते आपला सेल किती झाला याचा अंदाज देत आणि काही तासांत बिल करून त्याच दिवशी बिलाचा आकडा सांगत आणि तो आकडा त्यांनी सांगितलेल्या रकमेच्या जवळपास नक्की असायचा. कित्येक वेळा त्या आकड्यावरून एकूण आम्ही केलेली विक्री किती याचाही आकडा ते सांगत आणि तोही आकडा जवळजवळ तसाच असायचा. माझा मित्र शैलेश याचा साक्षीदार आहे. प्रदर्शनाकडे आणि विक्रीकडे इतके गंभीरपणे पाहणारा प्रकाशक त्या दरम्यान आम्ही पाहिला नाही.

मराठीतील रणजित देसाई, वि. स. खांडेकर, आनंद यादव, द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, व. पु. काळे अशा अनेक नामवंत लेखकांचे साहित्य त्यांनी सातत्याने उपलब्ध ठेवले. या लेखकांची पुस्तके आउट ऑफ प्रिंट आहेत असे सांगण्याची वेळ किंवा संधी त्यांनी वाचकांना आणि विक्रेत्यांना दिली नाही. यंदाच्या दिवाळीपूर्वी द. मा. मिरासदार यांचे निधन झाले. मी अक्षरधाराच्या दीपावली शब्दोत्सवामध्ये

त्यांना श्रद्धांजली म्हणून 'हसरी मिरासदारी' हे विशेष दालन सुरू केले, त्या दालनाच्या उद्‌घाटनाला प्रा. मिलिंद जोशी, प्रसाद मिरासदार, मिरासदार यांची कन्या सौ. सुनेत्रा मंकणी आणि सुनील मेहता उपस्थित होते. त्या प्रसंगी भाषणात त्यांनी लेखकाचे साहित्य सातत्याने उपलब्ध करणे आणि विक्रेत्यांनी ते वाचकांपर्यंत पोहोचवणे हीच खरी श्रद्धांजली आहे, असे मत व्यक्त केले होते.

माझ्यासारख्या कमी शिक्षण झालेल्या पण मराठी वाचण्याची आवड असलेल्या माणसाला डॅन ब्राऊन, सुधा मूर्ती, डॉ. एस. एल. भैरप्पा, ध्रुव भट, जेफ्री आर्चर यांचे साहित्य वाचता आले ते केवळ सुनील मेहता यांच्यामुळे. अनेक भाषांमध्ये गाजलेली पुस्तके मराठीत आणून मराठी वाचकांवर त्यांनी अनंत उपकार केले आहेत. सुनील मेहता आणि उमाताई कुलकर्णी यांच्यामुळे आम्ही भारतीय साहित्यातील महान साहित्यिक डॉ.एस.एल.भैरप्पा यांना कार्यक्रमाच्या निमित्ताने आमंत्रित करू शकलो. त्यांच्याकडे कोणतीही मदत मागितली आणि शक्य असेल तर ते लगेच प्रतिसाद देत आणि जर शक्य नसेल तर अगदी स्पष्टपणे नकारही देत. त्यांच्या स्वभावाबाबत प्रकाशन व्यवसायात वेगवेगळे अर्थ लावून बोलले जात होते; पण प्रत्यक्षात सुनील मेहता तसे नव्हते. त्यांचा स्वभाव जवळून पाहता, अनुभवता आला होता. तो खूप मोठ्या मनाचा माणूस होता, याचा आम्ही अनेक वर्षं अनुभव घेतला.

मराठी प्रकाशकांना कॅटलॉगला फारसे महत्त्व देताना मी कधीच पाहिले नाही. अलीकडे काही मोजकीच मंडळी या गोष्टीकडे लक्ष देताना दिसत आहेत; पण मेहतांनी कॅटलॉग या गोष्टीकडे खूप गंभीरपणे पाहिले आणि गेली अनेक वर्षे त्यांनी दरमहा नवीन कॅटलॉग सातत्याने दिला. त्यातही विविध प्रयोग केले. 'तू वर्ल्ड बुक फेअर, कोलकाता बुक फेअर पाहिले पाहिजेस.' असे सांगणारा एकही प्रकाशक मी पाहिला नाही; पण सुनील मेहता मला नेहमी हे सांगायचे आणि मी ते पाहून आलो. आल्यावर या 'बुक फेअर' मधून अनेक गोष्टी शिकलो आणि प्रदर्शनात त्या गोष्टी अमलात आणल्या. त्याचे श्रेय सुनील मेहता यांनाच जाते.

आम्ही जास्तीत जास्त विक्री करावी यासाठी ते केवळ प्रोत्साहन देत नव्हते, तर प्रत्यक्षात त्या बदल्यात काही गोष्टी करत होते. दिवाळीत त्यांनी

दिलेल्या भेटवस्तू आजही त्यांची आठवण करून देतात. वार्षिक विक्री रकमेवर ते दरवर्षी ठरावीक रकमेची पुस्तके आपणहून देतात. आजवर २५ लाख रुपयांहून अधिक पुस्तके त्यांनी आम्हाला विनामूल्य दिली आहेत. ही गोष्ट विक्रेत्यांचे मनोबल वाढवणारी आहे. त्यांच्या पुस्तकांचा ते स्वत:च इतका गाजावाजा करत असत, त्यामुळे विक्रेत्यांना विनासायास विक्री मिळत असे आणि त्यात नफाही मिळत असे. काही वर्षांपूर्वी विक्रेत्यांना क्रेडिटवर पुस्तके न देण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. सुरुवातीला विक्रेत्यांना याचा खूप राग आला; पण हळूहळू त्याचा स्वीकार झाला; कारण त्यांची पुस्तके व लेखक असे आहेत की विक्रेत्यांना त्याचा निर्णय नाकारणे शक्यच नव्हते.

माझे-त्यांचे व्यक्तिगत मतभेद खूप वेळा झाले. आम्ही दोघांनी एकाच वर्षात कामाला सुरुवात केली, दोघांचे वयही जवळजवळ सारखेच आणि आमचा रागही तसाच होता; पण सुनील मेहतांनी व्यक्तिगत राग कधीही व्यवहारात आणला नाही, हे या माणसाचे मोठेपण होते. याचे मोठे उदाहरण म्हणजे एकदा नारायण राणे साहेबांना सोनिया गांधी यांचे पुस्तक हवे होते. या पुस्तकाचे प्रकाशन दुसऱ्या दिवशी होणार होते; पण साहेबांना त्याच दिवशी पुस्तक हवे होते. रात्रीचे अकरा वाजले होते. एवढ्या उशिरा सुनील मेहता यांना फोन करू का नको, असा मला प्रश्न पडला. शिवाय दोनच दिवसांपूर्वी त्यांचा आणि माझा एका गोष्टीवरून वाद झाला होता. त्याचा राग ते नक्की काढतील असे वाटले तरीही मी फोन केला. त्यांनी 'मी १० मिनिटांत ऑफिसला पोचतो. तू ये.' असे शांतपणे सांगितले. रात्री ११ वाजता मी राणेसाहेबांना पुस्तक दिले. यापूर्वीही अनेकवेळा त्यांनी सुट्टीच्या दिवशीही स्वत: पुस्तके पॅक करून ट्रान्सपोर्ट, ट्रॅव्हल्स, टॅक्सीवर त्या-त्या वेळी शक्य असेल त्या मार्गाने पुरवली आहेत, हे कदापि विसरता येणार नाही.

काळानुसार बदलायची वृत्ती असलेले, व्यावसायिक अडचणींचे रडगाणे न गाता सतत नवे उपक्रम हाती घेऊन स्वत:चे असे वेगळे स्थान निर्माण करणारे आमचे मित्र सुनील मेहता यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन!

**– रमेश राठीवडेकर**

## सुनील अनिल मेहता- काही हृद्य आठवणी

महाराष्ट्र टाइम्समध्ये सुनील अनिल मेहता यांच्या आकस्मिक निधनाचं वृत्त समजलं आणि मनावर वार झाल्याची भावना निर्माण झाली. त्यानंतर आजपर्यंत अनेकवेळा सुन्न मन:स्थिती अनुभवली.

गेली बारा/पंधरा वर्षं मी त्यांच्यासाठी अनुवादिका म्हणून काम केलं. आमची पहिली भेट २००८च्या जून महिन्यात झाली. माझ्या एका अनुवादित पुस्तकाचा प्रस्ताव मी त्यांच्यापुढे मांडला. रीतसर प्राथमिक बोलणी फोनवर झाली आणि त्यांनी पुस्तक प्रकाशित करायची इच्छा दर्शवली व मला भेटायला बोलावलं.

मला ती भेट अजूनही चांगली आठवते. माझं वास्तव्य मुंबईत, त्यामुळे पुण्यातील माझ्या बहिणीसह मी त्यांना भेटायला गेले. औपचारिक बोलणी झाल्यानंतर मी बरोबर नेलेलं आणखी एक पुस्तक त्यांना दाखवलं. सहा पुस्तकांच्या मालिकेतील ते पाचवं पुष्प होतं. डॉ. अलेक्झांडर mack call स्मिथ या सुप्रसिद्ध लेखकानं लिहिलेलं ते पुस्तक इतर इंग्रजी पुस्तकांपेक्षा वेगळ्या धाटणीचं होतं. एका तरुण कृष्णवर्णीय स्त्री-गुप्तहेराची ती कहाणी मला भावली होती. मी त्याविषयी थोडं बोलले तेव्हा माझ्यासमोरच त्यांनी (बहुधा) गूगलवर त्याविषयी माहिती काढली आणि माझ्या मताला दुजोरा दिला.

त्यांनी दिलेल्या पुस्तकाविषयी बोलण झाल्यानंतर मी मुंबईला परतले. अनुवादित पुस्तकावर संस्कार करायला सुरुवात केली आणि आठच दिवसांत मला त्यांचा फोन आला. मी 'नं. वन डिटेक्टिव्ह एजन्सी'चे हक्क मिळवले आहेत. आपण पूर्ण मालिका करणार आहोत. तुम्ही त्यावर काम सुरू करायला हरकत नाही. मला आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. इतक्या लवकर आपल्यासारख्या नव्या लेखिकेच्या मताची दाद घेतली जाईल, त्यावर कृती केली जाईल, अशी कल्पनाच केली नव्हती मी. माझ्या तोपर्यंतच्या अनुभवाला छेद देणारा तो अनुभव मी कधीच विसरू शकणार नाही. असे सुखद धक्के मला पुढेही अनेक वेळा बसले. इंग्रजी साहित्याची आवड आणि अभ्यास असल्यामुळे मी त्यानंतरही त्यांना अनेक पुस्तकं सुचवली. बहुतेक वेळा ते त्यावर पुढील कारवाई करत आणि आपली

कार्यतत्परता दर्शवत असत. लेखकाला/अनुवादकाला आदर देण्याची त्यांची वृत्ती मला पहिल्या भेटीत, प्रत्यक्ष बोलण्यात जाणवली होतीच; पण पुढेही प्रत्येक वेळी तोच अनुभव आला. त्यामुळे तो त्यांचा मूळ स्वभाव आहे हे जाणवत गेलं.

मात्र, त्यांच्यातला व्यावसायिक सतत जागरूक असतो, याचेही काही सकारात्मक अनुभव मला आले. अगदी पहिल्याच भेटीत मी त्यांच्यापाशी माझ्या एका प्रकाशित पुस्तकाचा उल्लेख केला व म्हटलं, स्वैर अनुवाद असल्यामुळे कायदेशीर परवानगी घेतली नव्हती. त्यावर ते लगेच म्हणाले, 'असं पुन्हा कधी करू नका, गोत्यात याल.'

त्यांचे ते दोन शब्द - 'गोत्यात याल', मी कधीच विसरले नाही. कॉपीराईटचा कायदा कडक असतो. तो डावलल्यास अनुवादकाला व प्रकाशकालाही मोठी किंमत मोजावी लागते, हे तेव्हा मला समजलं आणि मी कानाला खडा लावला.

मेहता प्रकाशनानं माझी दहा/बारा पुस्तकं प्रकाशित केली हे मला अभिमानानं सांगावंसं वाटतं. त्या निमित्तानं तशा मोजक्याच भेटी झाल्या. गेली काही वर्षं संगणकावर लेखन केल्यामुळे प्रत्यक्ष न भेटूनही भागत असे; पण मानधनाबाबतही कधी बोलावं लागलं नाही इतका त्यांचा चोख व्यवहार असे. त्यामुळे त्यांची मनात ठसलेली प्रतिमा म्हणजे एक सच्चा व्यावसायिक, आपल्या व्यवसायावर निष्ठा ठेवणारा आणि म्हणूनच व्यवसायाशी निगडित असलेल्या सर्वच व्यक्तींना योग्य तो आदर देणारा माणूस. चेहऱ्यावर प्रसन्न हसू हीच त्यांची ओळख.

एक उमदं व्यक्तिमत्त्व इतक्या अनपेक्षितपणे खुडलं गेलं, हा धक्का पचवणं फार कठीण आहे. त्यांच्या व्यवसायाला सदैव आशीर्वाद देणारे अनिल मेहता आपल्या पुत्राशोकावर मात करून नातवांना उभारी देतील व कार्यक्षम कर्मचाऱ्यांना योग्य सल्ला देत व्यवसाय वृद्धिंगत करण्यास मदत करतील याची खात्री वाटते.

ईश्वरेच्छा बलीयसी.

हितेच्छू,

**– नीला चांदोरकर**

## १६ मार्च ते १५ एप्रिल २०२२ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ मार्च दरम्यान खास सवलत**

**१६ मार्च - झोई जेनी यांचा जन्मदिन**

'आकाश बदलताना' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**१७ मार्च - बाळ भागवत यांचा जन्मदिन**

'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

**१७ मार्च - फ्रँक गिलब्रेथ यांचा जन्मदिन**

'चीपर बाय दी डझन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**१९ मार्च - आयर्विंग वॅलेस यांचा जन्मदिन**

'सेकंड लेडी', 'द गेस्ट ऑफ ऑनर', 'द मिरॅकल', 'द सेव्हन्थ सिक्रेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२४५/- । सवलत किंमत ६९९/-**

**२० मार्च - विल्यम डॅलरिंपल यांचा जन्मदिन**

'व्हाइट मुघल्स', 'रिटर्न ऑफ अ किंग', 'अराजक' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८४०/- । सवलत किंमत १०५९/-**

**२२ मार्च - सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन**

'चाळिशीनंतरची वाटचाल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

**२३ मार्च - डॉ. डेव्हिड जे. श्वार्त्झ यांचा जन्मदिन**

‘द मॅजिक ऑफ थिंकींग बिग’, ‘द मॅजिक ऑफ थिंकिंग सक्सेस’ ‘द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७९०/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**२५ मार्च - व. पु. काळे यांचा जन्मदिन**

व. पु. काळे यांच्या सर्व पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७४८०/- । सवलत किंमत ४३३९/-**

---

**२५ मार्च - टॉम मोनाघन यांचा जन्मदिन**

‘पिझ्झा टायगर’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २२९/-**

---

**२६ मार्च - राहुल गोखले यांचा जन्मदिन**

‘विज्ञानातील सरस आणि सुरस’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

---

**२६ मार्च - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन**

‘अर्थाच्या शोधात’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**२६ मार्च - राजशेखर हिरेमठ यांचा जन्मदिन**

‘मराठी व्याकरण परिचय’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**२६ मार्च - उमेश कदम यांचा जन्मदिन**

‘एक होता मित्र’, ‘केवळ मैत्रीसाठी’, ‘संहार’, ‘उद्‌ध्वस्त’, ‘स्थलांतर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ५७९/-**

---

**२९ मार्च - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्मदिन**

‘शेतकऱ्याचा असूड : महात्मा जोतीराव फुले’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ८९/-**

**२९ मार्च - विवेक शानभाग यांचा जन्मदिन**
‘घाचर घोचर’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**३० मार्च - मणी भौमिक यांचा जन्मदिन**
‘परमेश्वर : एक सांकेतिक नाव’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**३० मार्च - फिलिप गूल्ड यांचा जन्मदिन**
‘आयुष्याचा अंतिम संस्कार’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ११९/-**

**खालील संचांवर १ ते १५ एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१ एप्रिल - सुधा पाटील यांचा जन्मदिन**
‘बाल परिचर्या’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २०९/-**

---

**१ एप्रिल - सुरेश वसंत नाईक यांचा जन्मदिन**
‘कविता दोघांची...’, ‘या सुखांनो’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३३०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**३ एप्रिल - किशोर पवार यांचा जन्मदिन**
‘आपली सृष्टी’ मालिकेतील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११००/- । सवलत किंमत ६४९/-**

---

**४ एप्रिल - सौरभ दुग्गल यांचा जन्मदिन**
‘आखाडा’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

---

**५ एप्रिल - जोसेफ लेलिव्हेल्ड यांचा जन्मदिन**
‘महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत २९९/-**

**५ एप्रिल - व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्मदिन**

व्यंकटेश माडगूळकर यांच्या ४१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५३७५/- । सवलत किंमत ३२२९/-**

---

**७ एप्रिल - जागतिक आरोग्यदिन**

संच १ - 'आरोग्यासाठी योग', 'चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य', 'चला जाणून घेऊ या! शाकाहार', 'चिकन सूप फॉर द सोल अस्थमा', 'चिकन सूप फॉर द सोल बॅक पेन', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'हृदयविकार निवारण', 'चाळिशीनंतरची वाटचाल', '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६८५/- । सवलत किंमत १०९९/-**

संच २ - 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'रूप करा सुरूप', 'गर्भसंस्कार', 'मिरॅक्युलस इफेक्ट्स ऑफ ॲक्युप्रेशर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ७०९/-**

---

**७ एप्रिल - अतुल कहाते यांचा जन्मदिन**

'ॲडॉल्फ हिटलर', 'अमेरिकी राष्ट्रपती', 'अंतराळ स्पर्धा', 'हिलरी क्लिंटन', 'रुपेरी सिंधू', 'स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला तंत्रज्ञ!', 'वॉरन बफे', 'वॉरन बफेच्या यशाचे ५० मंत्र', 'गुंतवणूक भान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२९५/- । सवलत किंमत १४५९/-**

---

**८ एप्रिल - रणजित देसाई यांचा जन्मदिन**

रणजित देसाई यांच्या ४२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६६७५/- । सवलत किंमत ४६४९/-**

---

**१० एप्रिल - वर्षा अडालजा यांचा जन्मदिन**

'अणसार' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २०९/-**

---

**१० एप्रिल - एच.व्ही. सरदेसाई यांचा जन्मदिन**

'धन्वंतरी घरोघरी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १२९/-**

**११ एप्रिल - डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा जन्मदिन**

'भारतीय साहित्यिक', 'खाली जमीन वर आकाश', 'समकालीन साहित्यिक', 'वाङ्मय विचार' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ४९९/-**

`IN BETWEEN' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २३९/-**

**११ एप्रिल - महात्मा फुले यांचा जन्मदिन**

'शेतकऱ्याचा असूड', 'महात्मा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ३४९/-

**१२ एप्रिल - छाया महाजन यांचा जन्मदिन**

'कॉलेज', 'मानसी', 'एकादश कथा', 'यशोदा', 'मुलखावेगळा', 'अज्ञात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०३०/- । सवलत किंमत ५९९/-**

**१३ एप्रिल - जालियनवाला बाग हत्याकांड दिन**

'जालियनवाला बाग' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-**

**१४ एप्रिल - द. मा. मिरासदार यांचा जन्मदिन**

द. मा . मिरासदार यांच्या २५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३३९०/- । सवलत किंमत २०५९/-**

**१४ एप्रिल - आशा आपराद यांचा जन्मदिन**

'भोगले जे दु:ख त्याला...' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**१४ एप्रिल - डॉ. रवींद्र ठाकूर यांचा जन्मदिन**
'व्हायरस', 'महात्मा', 'धर्मयुद्ध' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०९५/- । सवलत किंमत ६४९/-**

'MAHATMA JYOTIRAO PHULE' (English) या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ५४९/-**

---

**१५ एप्रिल - जेफ्री आर्चर यांचा जन्मदिन**
'अ प्रिझनर ऑफ बर्थ', 'अॅन्ड देअरबाय हँग्ज अ टेल', 'बी केअरफुल व्हॉट यू विश फॉर', 'बेस्ट केप्ट सीक्रेट', 'कॅट ओ'नाईन टेल्स', 'फॉल्स इम्प्रेशन', 'केन अँड एबल', 'नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस', 'ओन्ली टाइम विल टेल', 'पाथ्स ऑफ ग्लॉरी', 'सन्स ऑफ फॉर्च्यून', 'द सिन्स ऑफ द फादर', 'टू कट अ लाँग स्टोरी शॉर्ट', 'ट्वेल्व्ह रेड हेरिंग्ज', 'अ क्विव्हर फुल ऑफ अॅरोज', 'अ ट्विस्ट इन द टेल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५९७०/- । सवलत किंमत २९४९/-**

---

**१५ एप्रिल - रवीन्द्र बागडे यांचा जन्मदिन**
'बोचकं', 'गटुळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-**

---


**१५ एप्रिल - डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांचा जन्मदिन**
'कृष्णदेवराय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १५९/-**


**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**
**website : www.mehtapublishinghouse.com**
आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.
**author@mehtapublishinghouse.com**

# रणजित देसाई

## यांची साहित्यसंपदा



'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/03/2022 Posting Date : 11/03/2022



रणजित देसाईंचे
साहित्य म्हणजे
वाचकांशी
उच्च भावनिक
स्तरावर साधलेला
कलात्मक संवाद

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,